**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०३**

नगरसचिव कार्यालय

दिनांक :- ०५/०९/२०१९

प्रति,

मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची मा.स्थायी समिती **सभा क्र -०३सोमवार दि. ०९ /०९/२०१९ रोजी दुपारी १.००वा.** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

प्र. नगरसचिव,

अहमदनगर महानगरपालिका

**सोमवार दिनांक - ०९ /०९/२०१९ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ७३ | अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ७४ | अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ७५ | अहमदनगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरिता दि.२६/०६/२०१९ पासून सहा महिने मानधनावर केलेल्या नेमणूकीस मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ७६ | अहमदनगर शहर पाणी पुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले तांत्रिक व अंतांत्रिक कर्मचारी यांची मानधनावर केलेल्या नेमणूकीस मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ७७ | श्री.सोमनाथ गोरक्षनाथ चव्हाण,लिपिक यांचे शिस्तभंग कारवाई प्रकरणी केलेल्या शिक्षे विरूध्द केलेले अपील मा.स्थायी समिती समोर सादर करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ७८ | अर्जदार मालमत्ताधारक मुथ्था बिल्डर्स ॲण्ड कंन्स्ट्रक्शचे भागीदार जवाहरलाल मोहनलाल मुथ्था , रा. गणेश कॉलनी पाईप लाईन रोड, अ.नगर प्रभाग समिती क्रमांक-१ वॉर्ड क्र.७५ बिल क्र.६४ व बिल नं.६५ यांचे चुकीची आलेली ओपन प्लॉटवरील नळकनेक्शनची नोंद पाणीपटटी रक्कम शास्तीसह निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ७९ | अर्जदार मालमत्ताधारक सौ. छाया नानासाहेब म्हस्के, रा. सोनचाफा कॉलनी, बोल्हेगाव ,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.६८ , बिल क्र.२ यांचे चुकीची आलेली पाणीपटटी रक्कम शास्तीसह निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ८० | अर्जदार मालमत्ताधारक श्री. सतिष रामलालजी छाजेड , रा. अमोल पॅराडाईज शेजारी बंगला नं.१३ सावेडी , अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र. ४९ , बिल क्र. ११४९ या बिलातील मालमत्ता कराची आकारणी केलेली अवाजवी घरपटटी रक्कम शास्तीसह निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ८१ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॅरिअर गायडन्स सेंटर करीता सावेडी येथील सावित्रीबाई फुले भाजी मार्केट वरील हॉल क्र.१३ भाडे तत्वावर मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८२ | नागरी दलितवस्ती सुधार योजना सन २०१८-२०१९ ई - निविदा क्र.२०७७ या निविदेच्या अंतर्गत प्र.क्र.१४ मधील शांतीनगर अंर्तगत सोनवणे ते अडागळे रस्ता कॉक्रीटीकरण करणे व खुली जागा विकसित करणे मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ८३ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणा-या घनकच-यावर स.नं.३४या ठिकाणी दैनंदिन १०० मे.टन क्षमतेचा processing plant १०० TPD at Burudgaon मशिनरी उभारणे व ५वर्षा करीता देखभाल व दुरूस्ती बाबत फेर ई - निविदा क्र.२१२१ अन्वये मागविण्यात आलेल्या ई - निविदेच्या लिफाफा क्र.-२ दराबाबतचा तुलनात्मक तक्ता मंजूरी बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८४ | महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान (राज्यस्तर)(व्याजाचे रकमेतुन) सन २०१८-२०१९ ई - निविदा क्र.२१११ या निविदेच्याअंतर्गत तोफखाना पोलीस चौकी ते भिस्तबाग चौक ते गजराज फॅक्टरी ते भिस्तबाग महालापर्यतचा रस्ता विकसित करणे मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ८५ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) सन २०१८-१९ अंतर्गत ई - निविदा क्र.१९८२ या निविदेच्या अंतर्गत नालेगांव अमरधाम येथे दहन ओटयासमोर मान्सुम शेड उभारणे मंजुरीबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८६ | निलक्रांती चौक ते दिल्ली दरबार हॉटेल ते नेप्ती दिल्लीगेट - बालिकाश्रम पावसाळी गटरचे चेंबर पर्यत १२०० एम.एम.व्यासाची पावसाळी गटर बाबत महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७(३) क नुसार केलेली कार्यवाही प्रतिवृत्त अवलोकनार्थ कार्यवाहीस्तव. |

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत- १]** विषय क्रमांक- ७३ ते ८६ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- ७३ सोमवार दि.०९/०९/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ :** इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांचेकडील जा.क्र. ४४९ दि. ६ / २ /२०१९ चा प्रस्ताव.

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांनी त्यांचेकडील जा. क्र. इलेक्ट्रीक ४४९ दि.०६/०२/२०१९ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " विद्युत विभागाकडे श्री. देवरे गितेश अण्णासाहेब व सय्यद इकबाल सुलेमान यांना जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणुक २३५७ दि. २४/०७/२०१८ रोजीचे कार्यालयीन आदेशाप्रमाणे पुर्वी हे मानधन वायरमन यापदावर कार्यरत होते, परंतु सदर वायरमन हे घरगुती कारणामुळे गैरहजर राहिल्यामुळे त्यांचे नाव आस्थापना विभागाकडुन कमी करण्यात आले होते. सद्यस्थितीत विद्युत विभागाकडे एकुण १२ मानधन वायरमन आहेत व कायम वायरमन एकुण ९ आहेत, विद्युत विभागामध्ये कर्मचा-यांची कमतरता पाहता सदर कर्मचारी यांना मानधन वायरमन यापदावर हजर करुन घेणे उचित वाटते" असे नमुद करुन सुचित केलेले आहे.

श्री. देवरे गितेश अण्णासाहेब व सय्यद इकबाल सुलेमान व इतर यांची यापुर्वी मा. स्थायी समिती ठराव क्रं. १०दि. १६/०७/२०१८च्या पुर्व मान्यता पारीत ठरावाच्या अनुषंगाने जा. क्र.आस्था. करारबध्द नेमणुक २३५७दि २४/०८/२०१८ अन्वये इलेक्ट्रीक विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी रु. ९,५००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि. १२/०५/२०१८ पासुन सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली होती. सदरची मुदत ही यापुर्वीच दि. १२/११/२०१८ रोजी पासुन समाप्त झालेली होती.

तद्नंतर इलेक्ट्रीक विभाग यांनी त्यांचेकडील जा. क्र.४९ दि. १९/१०/२०१८ अन्वये प्रस्ताव सादर करुन श्री. देवरे गितेश अण्णासाहेब व सय्यद इकबाल सुलेमान हे सतत गैरहजर राहत असल्याने त्यांना वगळुन इतर वायरमन यांची तांत्रिक खंड देवुन पुढिल सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननेमणूक करणे बाबत सुचित केलेले होते. त्यानुषंगाने जा.क्र.आस्था. करारबध्द ३५११ दि. १३/१२/२०१८ अन्वये श्री. देवरे गितेश अण्णासाहेब व सय्यद इकबाल सुलेमान यांना वगळुन इतर वायरमन यांची दि.१५/११/२०१८ रोजी पासुन सहा महिन्याकरीता मानधनावर नेमणुक करण्यात आलेली आहे. तथापि श्री. देवरे गितेश अण्णासाहेब व सय्यद इकबाल सुलेमान यांची यापुर्वीच दि. १२/११/२०१८ पासुन नियुक्तीची मुदत समाप्त झालेली असल्याने ते सद्यस्थितीमध्ये इलेक्ट्रीक विभागामध्ये कार्यरत नाहीत.

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र मनपा अधि.१९४९ मधील ५३च्या तरतुदी नुसार इलेक्ट्रीक विभागाकरीता अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी श्री. देवरे गितेश अण्णासाहेब व सय्यद इकबाल सुलेमान यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रु .९,५००/-या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा.स्थायीसमितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,मुलेअ व मुलेप यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,स्थायी समिती कडे मंजूरीसाठी पाठवावे

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम (५३) (ड) मध्ये आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजूरीवाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्याहून अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करात येणार नाही आणि लीलपीक या पदाश समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाऐवढे अथवा त्याहून अधिक वेतन असलेलया कोण्त्याही नेमणूकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही अशी तरतुद आहे.

सदर तरतुदीप्रमाणे विभागाने उचित निर्णय घ्यावा

मागील अ प्रमाणे सतत गैरहजर कर्मचा-यांना मानधवर घेणे संयुक्तीक नाही विभागाने उचित निर्णय घ्यावा.

यावर मा.उपायुक्त (सा) मुलेप यांच्या अभिप्रायानुसार गैरहजर कर्मचा-याला खंड पडल्यामुळे मानधनावर पुर्न

नियुक्ती देणे उचित होणार नाही तथापि आदेशार्थ सादर

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,श्री.सय्यद इकबाल यांना कामाची निकड पहात पुर्नर्नियुक्ती साठी स्थायी समितीमध्ये निर्णयासाठी ठेवा.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.मनोज कोतकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.मनोज कोतकर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.सोनाली चितळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी सय्यद इकबाल सुलेमान यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक २८/६/२०१९ पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा १४,२५०/- प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस हि सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.मनोज कोतकर सही /-

अनुमोदक :- मा.सौ.सोनाली चितळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३

विषय क्रमांक- ७४ सोमवार दि.०९/०९/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

**संदर्भ :** इलेक्ट्रीक विभाग यांचेकडील जा.क्र. इलेक्ट्रीक विभाग १८३ दि.०८/०८/२०१९ चा प्रस्ताव.

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, इलेक्ट्रीक विभाग यांनी त्यांचेकडील जा. क्र. इलेक्ट्रीक १८३ दि. ०८/०८/२०१९ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " इलेक्ट्रीक विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि. १६/०२/२०१९ ते १५/०८/२०१९ अखेर असुन सदरची मुदत ही दि. १६ / ०८ / २०१९ रोजी पासुन समाप्त होणार असल्याने त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत." सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणुक ६३१ दि. २७/०५/२०१९ अन्वये इलेक्ट्रीक विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांची रु. ९,५००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि. १६/०२/२०१९ पासुन सहा महिन्याकरीता मा.स्थायी समितीच्या कार्योत्तर मंजुरीस अधिन राहुन करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली होती. सदर कालावधीतील केलेल्या पुर्ननियुक्ती कार्योत्तर मिळणे करीता सदरचा प्रस्ताव इकडील जा.क्र.आस्था.वर्क.४२५ दि. ३१/०५/२०१९ अन्वये मा. स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता. सदरच्या प्रस्तावास मा. स्थायी समिती ठराव क्रमांक २१ दि. २७/०६/२०१९ अन्वये सदर कालावधीतील केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी दिलेली आहे. सदरची मुदत ही दि. १६/०८/२०१९ रोजी पासुन समाप्त होणार आहे.

दरम्यानकाळात इलेक्ट्रीक विभाग तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी सुभाष बापुराव सुळ व इतर सदरची केलेली पुर्ननियुक्तीची मुदत ही समाप्ती झालेली असल्याने सदरचा प्रस्ताव जा. क्र. आस्था. वर्क. ४४८ दि. २०/०६/२०१९ अन्वये मा. स्थायी समितीकडे पुर्व मंजुरीसाठी पाठविण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. स्थायी समिती ठराव क्रं. ३५ दिनांक २७ / ०६ / २०१६ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारीत केलेला आहे.

"अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात दरमहा मानधनावर सुभाष बापुराव सुळ व इतर तसेच खान शादाब रफिक यांची त्यांची मुदत समाप्तीनंतर त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढिल सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस पुर्व मान्यता देण्यात येत आहे. तसेच प्रस्तावित वायरमन यांच्या सध्याच्या मानधनामध्ये ५०% वाढ करण्यास हि सभा मान्यता देत आहे. खर्च मंजुर. नियमानुसार पुढिल कार्यवाही करावी."

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे मा. स्थायी समिती ठराव क्रं. ३५ दि. २७ / ०६ / २०१६ अन्वयेच्या पारीत मानवाढ पारीत ठरावाच्या अनुषंगाने रुपये १४,२५०/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास

मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे कामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे मा.सहा.आयुक्त यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,मुलेअ व मुलेप यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्रय की, मा.स्थायी समिती ठराव प्रस्तवा सोबत सादर केलला मा.स्थायी समिती ठराव क्र.३५ दि.२७/६/२०१६ च्या ठरावाची अंमलबजावणी बात उपायुक्त (सा) यांचे स्तरावर साप्रवि विभाग -२६६ दि.१७/०७/२०१८ च्या कार्यालयीन आदेशाप्रमाणे कार्यवाही करावी.
ठरावाच्या अंमलबजावणी साठी मुलेपा यांच्या अभिप्रयाची आवश्यकता नाही.
पुर्ननियुक्ती साठी मा.महासभेची मान्यता आवश्यक आहे.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,अ नुसार मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात मान्यतेस्तव सादर

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट

मा.श्री.मनोज कोतकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामये वाचून दाखविण्यात आला.

मा.सौ.संध्या पवार :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांना यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतच्या ऑफिस रिपोर्टा हि सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.
नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.संध्या पवार सही /-

अनुमोदक :- मा.सौ.दिपाली बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- ७५ सोमवार दि.०९/०९/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरिता दि.२६/०६/२०१९ पासून सहा महिने मानधनावर केलेल्या नेमणूकीस मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभाग

संदर्भ- १. मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त अहमदनगर महानगरपालिका यांचे मान्यतेने जा.क्र. पा.पु. ५०३ / दि.२१/०६/२०१८ अन्वये कार्यालयीन आदेश

२. जा.क्र.पा.पु./करारबध्द नेमणूक /१५१० दि.०१/०२/२०१९ अन्वये कार्यालयीन आदेश

३. मानधनावरील फिटर शेख आफाक शेख अजीज, व वीजतंत्री श्री. शिंदे डि.जी. यांचे दि.२४/६/२०१९ रोजीचे अर्ज

अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा वितरण व्यवस्थे अंतर्गत कर्मचा-या अभावी निर्माण झालेल्या परिस्थितीचे गांभीर्य विचारात घेवून पाणी पुरवठा विभागाकरीता कायम स्वरूपी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध होईपर्यंत पाणी पुरवठा विभागाकडील कामाचा अनुभव असलेले व महानगरपालिका सेवेतून निवृत्त झालेले शेख आफाक शेख अजीज, फिटर व श्री. शिंदे डि.जी. , वीजतंत्री यांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार पाणीपुरवठा विभागाकडे तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर ६ महिने कालावधीसाठी दरमहा मानधन किमान रू.१२०००/- प्रमाणे जा.क्र. पा.पु. करारबध्द नेमणूक संदर्भिय क्र.२ अन्वये दि.२४/१२/२०१८ पासून ६ महिने करिता तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करण्यात आलेली होती.

वरील प्रमाणे केलेल्या नेमणूकीस मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी मिळणेसाठी जा.क्र.पा.पु.१६५० दि.६/३/२०१९ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेले आहे.

त्यानुसार सदर कर्मचारी दि.२४/१२/२०१८ पासून पाणी पुरवठा विभागाकडे कार्यरत होते. व सदरचा नेमणूकीचा ६ महिन्याचा कालावधी दि.२३/६/२०१९ रोजी संपलेला आहे. संदर्भ क्र.३ अन्वये वरील कर्मचारी यांनी पुन्हा काम करण्याची इच्छा असून मुदतवाढ मिळावी अशी विनंती केलेली आहे.

या अनुषंगाने अहवाल सादर की, शहर पाणी पुरवठा विभाग वितरण व्यवस्थे करीता कर्मचा-यांची तीव्र निकड आहे. त्यासाठी वरील नमुद कर्मचारी यांना मा.स्थायी समितीचे मंजूरीने तांत्रिक खंड देवुन मुदतवाढ देणे आवश्यक व क्रमप्राप्त आहे.

यास्तव पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता कर्मचा-यांची निकड लक्षात घेता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार मानधनावरील सेवानिवृत्त फिटर शेख आफाक शेख अजीज व सेवानिवृत्त वीजतंत्री श्री. शिंदे डि.जी. यांना किमान २ दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पाणी पुरवठा विभागाकडे तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर ६ महिने कालावधीसाठी दरमहा मानधन किमान रू.१२०००/- प्रमाणे मुदतवाढ देवून नेमणूक करणेस व केलेल्या नेमणूकीस मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी घेणे संयुक्तीक राहील. /अ

तथापी आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, "अ" नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, 'अ' मान्य

अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणीपुरवठा वितरण व्यवस्थे अंतर्गत कर्मचा-यां अभावी निर्माण झालेल्या परिस्थितीचे गांर्भीय विचारात घेवून पाणी पुरवठा विभागाकरीता कायम स्वरूपी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध होईपर्यंत पाणी पुरवठा विभागाकडील कामाचा अनुभव असलेले व महानगरपालिका सेवेतून निवृत्त झालेले शेख आफाक शेख अजीज, फिटर व श्री. शिंदे डि.जी. वीजतंत्री यांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार पाणीपुरवठा विभागाकडे तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर ६ महिने कालावधीसाठी दरमहा मानधन किमान रू.१२०००/- प्रमाणे करारबध्द नेमणूक जा.क्र. पा.पु.४१२ दि.१०/७/२०१९ अन्वये दि.२४/१२/२०१८ पासून ६ महिने करिता तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करण्यात आलेली होती.

त्यानुसार सदर कर्मचारी दि.२४/१२/२०१८ पासून पाणी पुरवठा विभागाकडे कार्यरत होते. व सदरचा नेमणूकीचा ६ महिन्याचा कालावधी दि.२४/६/२०१९ रोजी संपलेला आहे. दि.२४/६/२०१९ अन्वये वरील कर्मचारी यांनी पुन्हा काम करण्याची इच्छा असून मुदतवाढ मिळावी अशी विनंती केलेली आहे.

या अनुषंगाने अहवाल सादर की, शहर पाणी पुरवठा विभाग वितरण व्यवस्थे करीता कर्मचा-यांची तीव्र निकड आहे. त्यासाठी वरील नमुद कर्मचारी यांना मा.स्थायी समितीचे मंजूरीने तांत्रिक खंड देवून मुदतवाढ देणे आवश्यक व क्रमप्राप्त आहे.

या अनुषंगाने दि.२५/६/२०१९ रोजीच्या प्रस्तावानुसार मा.आयुक्त साहेब यांचे मंजुरी नुसार संबंधीत कर्मचारी यांना दि.२६/०६/२०१९ पासून ६ महिने कालावधी करिता पा.पु. जा.क्र. ४१२ दि.१०/७/२०१९ अन्वये कार्यालयीन आदेश देण्यात आलेले आहेत. सदर प्रस्तावात नमूद केलेनुसार संबंधीत कर्मचारी यांना मुदतवाढ देवून नेमणूक करणेस व केलेल्या नेमणूकीस मा.स्थायी समितीची कार्योत्तर घेणे आवश्यक आहे.

यास्तव पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता कर्मचा-यांची निकड लक्षता घेता, महराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार मानधनावरील सेवानिवृत्त शेख आफाक शेख अजीज, फिटर व सेवानिवृत्त श्री.शिंदे डि.जी. वीजतंत्री यांना किमान २ दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पाणी पुरवठा विभागाकडे दि.२६/६/२०१९ पासून तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर ६ महिने कालावधीसाठी दरमहा मानधन किमान रू.१२०००/- प्रमाणे मुदतवाढ देवून नेमणूक करणेस व केलेल्या नेमणूकीस मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी घेणे संयुक्तीक राहील.

तरी वरील आशयाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर कार्योत्तर मंजूरी मिळणे करीता सविनय सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरिता महानगरपालिका सेवेतून निवृत्त झालेले शेख आफाक शेख अजीज, फिटर व श्री. शिंदे डि.जी. , वीजतंत्री यांची मुदतवाढ देवून नेमणूक करणेस व केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट

मा.श्री.मनोज कोतकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामये वाचून दाखविण्यात आला.

मा.सौ.संध्या पवार :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता कर्मचा-यांची निकड लक्षता घेता, महराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार अहमदनगर महानगरपालिकेतील सेवानिवृत्त श्री.शेख आफाक शेख अजीज, फिटर व श्री.शिंदे डि.जी. वीजतंत्री यांना किमान २ दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दि.२६/६/२०१९ पासून तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर सहा महिने कालावधीसाठी नेमणूक करणेस व केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी बाबतच्या ऑफिस रिपोर्टा हि सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.संध्या पवार सही /-

अनुमोदक :- मा.सौ.दिपाली बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- ७६ सोमवार दि.०९/०९/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर शहर पाणी पुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले तांत्रिक व अंतांत्रिक कर्मचारी यांची मानधनावर केलेल्या नेमणूकीस मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभाग

संदर्भ- सेवानिवृत्त कर्मचारी पाणीपुरवठा विभाग यांचे अर्ज सोबत-पी-१ ते पी-१७

उपरोक्त विषयाबाबत विनंती रिपोर्ट सादर की, अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा वितरण व्यवस्थापने अंतर्गत वरील नमुद कर्मचारी महानगरपालिका सेवेतून निवृत्त झालेले आहेत. या निवृत्त झालेल्या कर्मचा-यांचे संदर्भिय अर्ज इकडेस प्राप्त झालेले असून त्यामध्ये त्यांनी मानधनावर काम करण्यास तयारी दर्शविलेली आहे.

या अनुषंगाने अहवाल सादर की, अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजने अंतर्गत मुळानगर पंपीग स्टेशन ते वसंत टेकडी दरम्यान कार्यरत शहर पाणी पुरवठा योजनेच्या कामाचे विस्तृत स्वरूप व आवश्यकता विचारात घेवून याकामी एकूण १४५ कर्मचा-यांचा आकृतीबंध मंजूर आहे सन १९९९ ला सदर योजना हस्तांतरणाच्या वेळेस एकुण ११० कर्मचारी योजनेवर हजर झालेले होते. तद्नंतर आजअखेर यापैकी ६८ कर्मचारी सेवानिवृत्त / मयत झालेले असल्याने फक्त एकूण ४२ कर्मचारी कार्यरत आहेत.

शहर पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेची कर्मचा-यां अभावी अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे.कारण वितरण व्यवस्थेचे कामाचे स्वरूप विचारात घेता त्याकरीता असलेला तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी वर्गअत्यंत कमी प्रमाणात आहे.त्यामुळे नागरिकांच्या प्राप्त दैनंदिन तक्रारींचा वेळेत निपटारा होत नाही. पर्यायाने शहरासाठी मुळाधरण येथून पाणी उपलब्ध होत आहे ते वितरण करीत असतांना काही नागरी भागास गरजेपेक्षा जास्त व काही भागास अत्यल्प पाणी पुरवठा होत आहे.त्यामुळे पाणी पुरवठा विषयक दैनंदिन तक्रारी वाढत जावून कर्मचा-या अभावी पाणी वितरण व्यवस्थेची व दुरूस्तीची अत्यंत गंभीर समस्या निर्माण झालेली आहे.

त्यासाठी शहर पाणी योजनेसह वितरण व्यवस्थेतील सेवानिवृत्त / मयत झालेल्या कर्मचा-यांच्या जागी नव्याने / पर्यायी कर्मचाी उपलब्ध करून देणेबाबत मा.आयुक्त / मा.उपायुक्त यांचे मान्यतेने यापूर्वी असंख्य प्रस्तावाद्वारे आस्थापना विभागाकडे मागणी करण्यांत आलेली आहे. परंतु आस्थापना विभागाकडून मागणीची पूर्तता झालेली नाही. त्यामुळे कर्मचा-या अभावी या विभागाची अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे.

करीता महानगरपालिकेकडून पाणी पुरवठा विभागाकरीता कायम स्वरूपी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध होईपर्यत पाणीपुरवठा विभागाकडील कामाचा अनुभव असलेले व महानगरपालिका सेवेतून निवृत्त झालेले खालील नमुद कर्मचारी हे पुढील प्रमाणे काम पहात होते व सदर कामाचा त्यांना उत्तम अनुभव आहे.

**<u>शहर पाणी पुरवठा योजनेकरीता मानधनावर घ्यावयाचे कर्मचारी-</u>**

| अ क्र | सेवानिवृत्त कर्मचा-याचे नाव | हुद्दा | सेवानिवृत्तीपुर्वी करीत असलेले काम / स्वरूप | नेमणूक करावयाचे ठिकाण / काम |
|---|---|---|---|---|
| १ | धोंडीराम नामदेव कराळे | बिगारी वॉचमन | विळद पंपीग स्टेशन, पंप ऑपरेटर मदतनीस | विळद पंपीग स्टेशन, पंप ऑपरेटर मदतनीस |
| २ | श्री. देविदास माधवराव लेंडकर | बिगारी वॉचमन | विळद पंपीग स्टेशन, पंप ऑपरेटर मदतनीस | विळद पंपीग स्टेशन, पंप ऑपरेटर मदतनीस |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | श्री. दशरथ भागाजी शिंदे | फिटर | शहर पाणी पुरवठा योजना मुख्य जलवाहिनी देखभाल व दुरूस्ती | शहर पाणी पुरवठा योजना मुख्य जलवाहिनी देखभाल व दुरूस्ती |
| ४ | श्री. गोरख रंगनाथ तेलोरे | वीजतंत्री | विळद पंपीग स्टेशन, मेटेनन्स विभाग | विळद पंपीग स्टेशन, मेटेनन्स विभाग |
| ५ | घोडेकर ए.ए. | वीजतंत्री | विळद पंपीग स्टेशन, मेटेनन्स विभाग | विळद पंपीग स्टेशन, मेटेनन्स विभाग |
| ६ | श्री. दिगंबर भाउ कदम | बिगारी वॉचमन | विळद पंपीग स्टेशन, पंप ऑपरेटर मदतनीस | विळद पंपीग स्टेशन, पंप ऑपरेटर मदतनीस |
| ७ | श्री. गागरे साहेबराव | बिगारी वॉचमन | विळद जलशुध्दीकरण केंद्र फिल्टर ऑपरेटर मदतनीस | विळद जलशुध्दीकरण केंद्र फिल्टर ऑपरेटर मदतनीस |

**<u>शहर वितरण व्यवस्थेकरीता घ्यावयाचे कर्मचारी-</u>**

| अ क्र | सेवानिवृत्त कर्मचा-याचे नाव | हुद्दा | सेवानिवृत्तीपुर्वी करीत असलेले काम / स्वरूप | नेमणूक करावयाचे ठिकाण / काम |
|---|---|---|---|---|
| १ | बाबासाहेब एकनाथ नलगे | बिगारी वॉचमन | प्रभाग समिती क्र. ३ अंतर्गत दैनंदिन देखभाल व दुरूस्तीची फिटर विषयक कामे | प्रभाग समिती क्र. ३ अंतर्गत मुंकुंदनगर भागासाठी एकही फिटर नसल्याने |
| २ | शांताराम माधव पाचारणे | बिगारी वॉचमन | प्रभाग समिती क्र. १ अंतर्गत बोल्हेगाव- नागापूर भागासाठी फिटर विषयक कामे | बोल्हेगाव- नागापूर भागासाठी एकही फिटर नसल्याने |
| ३ | दिपक बाळु खताडे | बिगारी वॉचमन | रिझरवायर पाण्याची टाकी येथे वॉचमन | रिझरवायर पाण्याची टाकी येथे वॉचमन |
| ४ | मधुकर विश्वनाथ काळे | बिगारी वॉचमन | प्रभाग समिती क्र.१ अंतर्गत पाईप लाईन रोड , भिस्तबाग , वैदुवाडी , इत्यादी भागाचे दैनंदिन पाणी वाटप | प्रभाग समिती क्र.१ अंतर्गत पाईप लाईन रोड , भिस्तबाग , वैदुवाडी , इत्यादी भागाचे दैनंदिन पाणी वाटप |
| ५ | बाबासाहेब चॉदखान पठाण | बिगारी वॉचमन | प्रभाग समिती क्र.४ अंतर्गत नागरी भागाचे पाणी वाटप नियंत्रण ठेवणे | प्रभाग समिती क्र.४ अंतर्गत नागरी भागाचे पाणी वाटप नियंत्रण ठेवणे |
| ६ | देवराम लक्ष्मण वाघमारे | बिगारी वॉचमन | प्रभाग समिती क्र.३ अंतर्गत जुने मुकुंदनगर , वाबळे कॉलनी , बॉम्बे हॉस्पीटल परिसर इत्यादी भागाचे दैनंदिन वाटप | प्रभाग समिती क्र.३ अंतर्गत जुने मुकुंदनगर , वाबळे कॉलनी , बॉम्बे हॉस्पीटल परिसर इत्यादी भागाचे दैनंदिन वाटप |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | सुरेश उत्तम साठे | बिगारी वॉचमन | शहर पाणी वितरण व्यवस्था व्हॉलमन नियंत्रक | शहर पाणी वितरण व्यवस्था व्हॉलमन नियंत्रक |
| ८ | शेख नय्युम इस्माईल | बिगारी वॉचमन | प्रभाग समिती क्र.३ अंतर्गत नवीन दर्गादायरा, दगडी चाळ, नशेमन कॉलनी, परिसर इत्यादी भागाचे दैनंदिन वाटप | प्रभाग समिती क्र.३ अंतर्गत नवीन दर्गादायरा, दगडी चाळ, नशेमन कॉलनी, परिसर इत्यादी भागाचे दैनंदिन वाटप |
| ९ | श्री. बाळु लक्ष्मण फुलसौंदर | बिगारी वॉचमन | सावेडी भागातील लक्ष्मीनगर सुर्यनगर , तवलेनगर , इत्यादी भागाचे पाणी वाटप | श्री. फुलसौंदर दि.३१/१२/२००८ ला सेवानिवृत्त होत असल्याने त्याच ठिकाणी |

यास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार पाणीपुरवठा विभागाकरीता तांत्रिक व अतांत्रिक अनुभवी कर्मचा-यांची आवश्यकता व निकड लक्षात घेता या विभागाकडील सेवानिवृत्त झालेले वरील नमुद कर्मचारी यांची पाणी पुरवठा विभागाकडे तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर ६ महिने कालावधीसाठी वीजतंत्री / फिटर यांची दरमहा मानधन किमान रू.१२,०००/- प्रमाणे व बिगारी / वॉचमन यांची दरमहा मानधन किमान रू.१०,०००/-प्रमाणे नेमणूक करणेस व केलेल्या नेमणूकीस मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी घेणे संयुक्तीक राहील. / अ

तथापी आदेशार्थ सविनय सादर.

| | | | |
|---|---|---|---|
| स्वाक्षरी | स्वाक्षरी | स्वाक्षरी | स्वाक्षरी |
| प्रभाग अभियंता | प्रभाग अभियंता | प्रभाग अभियंता | प्रभाग अभियंता |
| प्रभाग समिती क्र.१ | प्रभाग समिती क्र.२ | प्रभाग समिती क्र.३ | प्रभाग समिती क्र.४ |

येणेप्रमाणे वरीलप्रमाणे प्रभाग क्रमांक १,२,३,४ यांचा अहवाल असे.

यावर मा.पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, "अ" नुसार मान्यतेस्तव सादर

यावर मा.अति.आयुक्त यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालाप्रमाणे पान क्र.T-१ वरील परिच्छेद दोन मध्ये नमूद केले नुसार उपलब्ध कर्मचारी वर्ग अपुरा आहे. तरी उपरोक्त "अ" प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा. आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मान्य

००००

**टिपण्णी-**

अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजने अंतर्गत मुळानगर पंपीग स्टेशन ते वसंत टेकडी दरम्यान कार्यरत शहर पाणी पुरवठा योजनेच्या कामाचे विस्तृत्त स्वरूप व आवश्यकता विचारात घेवून याकामी एकुण १४५ कर्मचा-यांचा आकृतीबंध मंजूर आहे. सन १९९९ ला सदर योजना हस्तांतरणाच्या वेळेस एकुण ११० कर्मचारी योजनेवर हजर झालेले होते. तद्नंतर आज अखेर यापैकी ६८ कर्मचारी सेवानिवृत्त / मयत झालेले असल्याने फक्त एकुण ४२ कर्मचारी कार्यरत आहेत.

शहर पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेची कर्मचा-यां अभावी अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. कारण वितरण व्यवस्थेचे कामाचे स्वरूप विचारात घेता त्याकरिता असलेला तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी वर्ग अत्यंत कमी प्रमाणात आहे. त्यामुळे नागरिकांच्या प्राप्त दैनंदिन तक्रारीचा वेळेत निपटारा होत नाही. पर्यायाने शहरासाठी मुळाधरण येथून पाणी उपलब्ध होत आहे ते वितरण करीत असताना काही नागरी भागास गरजेपेक्षा जास्त व काही भागास अत्यल्प पाणीपुरवठा होत आहे.

त्यासाठी शहर पाणी योजनेसह वितरण व्यवस्थेतील सेवानिवृत्त / मयत झालेल्या कर्मचा-यांच्या जागी नव्याने / पर्यायी कर्मचारी उपलब्ध करून देणे बाबत मा.आयुक्त / मा.उपायुक्त यांचे मान्यतेने यापूर्वी असंख्य प्रस्तावाद्वारे आस्थापना विभागाकडे मागणी करण्यात आलेली आहे.परंतु आस्थापना विभागाकडून मागणीची पूर्तता झालेली नाही. त्यामुळे पाणीपुरवठा विषयक दैनंदिन तक्रारी वाढत जावून कर्मचा-यां अभावी पाणी वितरण व्यवस्थेची व दुरूस्ती अत्यंत गंभीर समस्या निर्माण झालेली आहे. शहर पाणी पुरवठा वितरण व्यवस्थापने अंतर्गत खालील नमुद कर्मचारी महानगरपालिका सेवेतून निवृत्त झालेले आहेत या निवृत्त झालेल्या कर्मचा-यांनी मानधनावर काम करण्यास तयारी दर्शविलेली होती.

त्याचप्रमाणे वरील नमुद सेवानिवृत्त कर्मचारी यांची मानधनावर ६ महिन्याकरीता नेमणूक करणे अनुषंगाने सादर प्रस्ताव दरम्यान मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांचेशी झालेल्या चर्चेच्या वेळी पाणीपुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त व पूर्वीचा कामाचा अनुभव असलेले वरील नमुद कर्मचारी यांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार पाणी पुरवठा विभगाकरिता तांत्रिक व अतांत्रिक अनुभवी कर्मचा-यांची आवश्यकता व निकड लक्षात घेता या विभागाकडील सेवानिवृत्त झालेले वरील नमुद कर्मचारी यांची पाणीपुरवठा विभागाकडे तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर ६ महिने कालावधीसाठी वीजतंत्री / फिटर यांची दरमहा मानधन किमान रू.१२,०००/-प्रमाणे व बिगारी / वॉचमन यांची दरमहा मानधन किमान रू.१००००/- प्रमाणे नेमणूक करणेस व केलेल्या नेमणूकीस मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी घेणे संयुक्तीक राहील. अशा आशयाच्या सादर प्रस्तावामध्ये मा.उपायुक्त (सा) , मा.अतिरिक्त आयुक्त व मा.आयुक्त यांनी प्रस्ताव मान्यतेसाठी मा.स्थायी समिती समोर ठेवण्यास प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे.

**वरील प्रमाणे प्राप्त मंजुरी नुसार इकडील जा.क्र. शहर पाणी पुरवठा /१६७१ दि.८/३/२०१९ अन्वये शहर वितरण व्यवस्थे करिता खालील १ ते ९ कर्मचा-यांची ६ महिने कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली आहे.**

| अ क्र | नाव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रूजू होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | बाबासाहेब एकनाथ नलगे | फिटर मदतनीस | १०,०००/- | प्रभाग समिती क्र. ३ अंतर्गत मुंकुंदनगर भागासाठी एकही फिटर नसल्याने |
| २ | शांताराम माधव पाचारणे | फिटर मदतनीस | १०,०००/- | प्रभाग समिती क्र.१ बोल्हेगाव - नागापूर देखभाल व दुरूस्ती विषयक कामे |
| ३ | दिपक बाळु खताडे | बिगारी वॉचमन | १०,०००/- | रिझरवायर पाण्याची टाकी येथे वॉचमन |
| ४ | मधुकर विश्वनाथ काळे | वॉलमान मदतनीस | १०,०००/- | प्रभाग समिती क्र.१ अंतर्गत भागाचे दैनंदिन पाणी वाटप नियंत्रीत ठेवणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | बाबासाहेब चॉदखान पठाण | वॉलमान मदतनीस | १०,०००/- | प्रभाग समिती .क्र.४ अंतर्गत भागाचे दैनंदिन पाणी वाटप नियंत्रीत ठेवणे |
| ६ | श्री देवराम लक्ष्मण वाघमारे | वॉलमान मदतनीस | १०,०००/- | प्रभाग क्र.३ मुकुंदनगर परिसरातील दैनंदिन पाणी वाटप |
| ७ | श्री सुरेश उत्तम साठे | वॉलमान | १२,०००/ | शहरातील वितरण व्यवस्था नियंत्रक |
| ८ | श्री शेख नय्युम इस्माईल | वॉलमान मदतनीस | १०,०००/- | प्रभाग क्र.३ नवीन दर्गादायरा सह इतर परिसराचे दैनंदिन पाणी वाटप |
| ९ | श्री बाळु लक्ष्मण फुलसौंद | वॉलमान मदतनीस | १०,०००/- | सावेडी भागातील लक्ष्मीनगर , सुर्यनगर तवलेनगर इत्यादी परिसराचे दैनंदिन पाणी वाटप |

**अ] यापैकी खालील नमुद कर्मचारी प्रत्यक्षात कामावर हजर झालेले असून कार्यरत आहेत.**

| अ.क्र. | नाव | रूजू होण्याचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | बाबासाहेब एकनाथ नलगे | प्रभाग समिती क्र.३ देखभाल व दुरूस्ती विषयक कामे |
| २ | शांताराम माधव पाचारणे | प्रभाग समिती क्र.१ बोल्हेगाव - नागापूर देखभाल व दुरूस्ती विषयक कामे |
| ३ | दिपक बाळु खताडे | रिझरवायर पाण्याची टाकी येथे वॉचमन |
| ४ | मधुकर विश्वनाथ काळे | प्रभाग क्र.१ अंतर्गत भागाचे दैनंदिन पाणी वाटप नियंत्रीत ठेवणे |
| ५ | श्री. बाळु लक्ष्मण फुलसौंदर | सावेडी भागातील लक्ष्मीनगर , सुर्यनगर , इत्यादी परिसराचे दैनंदिन पाणी वाटप |

**तसेच इकडील जा.क्र. शहर पाणी पुरवठा /१६७२ दि.०८/०३/२०१९ अन्वये शहर पाणी पुरवठा योजने करिता खालील १ ते ७ कर्मचा-यांची ६ महिने कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली आहे.**

| अ क्र | नाव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रूजू होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | धोडीराम नामदेव कराळे | पंपऑपरेटर / मदतनीस | १०,०००/- | विळद पंपीग स्टेशन , पंप ऑपरेटर मदतनीस |
| २ | देविदास माधवराव लेंडकर | पंपऑपरेटर / मदतनीस | १०,०००/- | विळद पंपीग स्टेशन , पंप ऑपरेटर मदतनीस |
| ३ | दशरथ भागाजी शिंदे | फिटर | १२,०००/- | शहर पाणी पुरवठा योजना मुख्य जलवाहिनी देखभाल व दुरूस्ती |
| ४ | गोरख रंगनाथ तेलोरे | वीजतंत्री | १२,०००/- | विळद पंपीग स्टेशन, मेटेनन्स विभाग |
| ५ | घोडेकर ए.ए. | वीजतंत्री | १२,०००/- | विळद पंपीग स्टेशन, मेटेनन्स विभाग |
| ६ | दिगंबर भाउ कदम | पंप ऑपरेटर / मदतनीस | १०,०००/- | विळद पंपीग स्टेशन, पंप ऑपरेटर मदतनीस |
| ७ | गागरे साहेबराव भागाजी | फिल्टर ऑपरेटर/ मदतनीस | १०,०००/- | जलशुध्दीकरण केंद्र विळद |

**ब ) यापैकी खालील नमुद कर्मचारी प्रत्यक्षात कामावर हजर झालेले असुन कार्यरत आहेत**

| अ.क्र. | नाव | कार्यरत ठिकाण |
|---|---|---|
| १ | देविदास माधवराव लेंडकर | विळद पंपीग स्टेशन , पंप ऑपरेटर मदतनीस |
| २ | दशरथ भागाजी शिंदे | शहर पाणी पुरवठा योजना मुख्य जलवाहिनी देखभाल व दुरूस्ती |
| ३ | गोरख रंगनाथ तेलोरे | विळद पंपीग स्टेशन, मेटेनन्स विभाग |
| ४ | घोडेकर ए.ए. | विळद पंपीग स्टेशन, मेटेनन्स विभाग |
| ५ | गागरे साहेबराव भागाजी | जलशुध्दीकरण केंद्र विळद |

यास्तव जा.क्र.शहर पाणी पुरवठा /१६७१ दि.८/३/२०१९ अन्वये शहर वितरण व्यवस्थे करिता १ ते ९ कर्मचा-यांची ६ महिने कालावधीसाठी केलेल्या नेमणूकी पैकी अ) नुसार प्रत्यक्षात हजर झालेले एकूण ५ कर्मचा-यांचे नेमणूकीस तसेच जा.क्र. शहर पाणी पुरवठा १६७२ दि.८/३/२०१९ अन्वये शहर पाणी पुरवठा योजने करिता १ ते ७ कर्मचा-यांची ६ महिने कालावधीसाठी केलेल्या नेमणूकी पैकी ब) नुसार प्रत्यक्षात हजर झालेले एकुण ५ कर्मचा-यांचे नेमणूकीस (एकुण १० कर्मचा-यांचे नेमणूकीस) मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी मिळणे संयुक्तीक आहे.

तरी वरील आशयाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर कार्योत्तर मंजूरी मिळणे करीता सविनय सादर.

येणेप्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा टिपपणी असे

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर शहर पाणी पुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले तांत्रिक व अंतांत्रिक कर्मचारी यांची मानधनावर केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.मनोज कोतकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामये वाचून दाखविण्यात आला.

मा.सौ.संध्या पवार :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर शहर पाणी पुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले तांत्रिक व अंतांत्रिक कर्मचारी यांची मानधनावर केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.संध्या पवार सही /-

अनुमोदक :- मा.सौ.दिपाली बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- ७७ सोमवार दि.०९/०९/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** श्री.सोमनाथ गोरक्षनाथ चव्हाण,लिपिक यांचे शिस्तभंग कारवाई प्रकरणी केलेल्या शिक्षे विरूध्द केलेले अपील मा.स्थायी समिती समोर सादर करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

मा.सभापती
स्थायीसमिती
अहमदनगर महानगरपालिका

विषय- श्री. सोमनाथ गोरक्षनाथ चव्हाण लिपिक यांचे शिस्तभंग कारवाई प्रकरणी केलेल्या शिक्षे विरूध्द केलेले अपील मा.स्थायी समिती समोर सादर करणे बाबत.

संदर्भ- श्री. सोमनाथ गोरक्षनाथ चव्हाण लिपिक यांचा दि.३/५/२०१९ रोजीचा अर्ज

उपरोक्त विषयास व संदर्भास अनुसरून प्रस्ताव सादर करण्यांत येते की, श्री. चव्हाण यांनी संदर्भिय अर्ज देवुन शिस्तभंग कारवाई प्रकरणी आरोपपत्र क्रमांक १०५९ दि.७/१/२००९ अन्वये माझेवर आरोपपत्र भरणेत येवुन विभागीय चौकशी करणेत आलेली आहे.

विभागीय चौकशीमध्ये मी माझेवरील आरोपाचे खंडन केलेले आहे. मी कोणत्याही प्रकारे दोषी नाही. परंतू माझे म्हणणे विचारात न घेता मला आस्था. जा.क्र. ८ दि.२/४/२०१९ अन्वये रू.५०००/- दंड करणेत आलेला आहे.

चौकशीमध्ये चौकशी अधिकारी तथा कामगार अधिकारी यांचे समोरील कामकाजात सुध्दा माझेवर कोणतेही आरोप सिध्द झालेले नाहीत असे असतांनाही मला शिक्षा करणेत आली ती पुर्णपणे चुकीची व नैसर्गीक न्याय तत्वाचे विरूध्द आहे. तरी सदरची शिक्षा माफ करणेसाठी सदरचा अपील अर्ज दाखल करित आहे. सदर अपील अर्जावर निर्णय होणेस मा.स्थायी समिती ही सक्षम अधिकारी आहे.

तरी माझा अपील अर्जा मंजूर करून मला करणेत आलेले दंड रू.५०००/- ची शास्ती माफ करावी असा अर्ज दिलेला आहे.

सदर बाबत सविस्तर प्रस्ताव सादर करणेत येते की, श्री. सोमनाथ गोरक्षनाथ चव्हाण लिपिक यांचे शिस्तभंग कारवाई प्रकरणी आस्थापना आदेश क्र.३७९२ दि.३०/१२/२००८ अन्वये निलंबित करण्यात येवुन विभागीय चौकशी प्रस्तावीत करणेत आली. श्री. सोमनाथ गोरक्षनाथ चव्हाण, लिपिक यांना जा.क्र. १०५९ दि.७/१/२००९ अन्वये आरोपपत्र देणेत येवुन त्यांचेवर आरोप ठेवण्यात आलेल आहे.

मा. चौकशी अधिकारी यांनी श्री. सोमनाथ गोरक्षनाथ चव्हाण , लिपिक यांचेवर ठेवणेत आलेल्या आरोपची चौकशी ही मुद्दा क्र.१ होकारार्थी मुदद्दा क्र.२ नकारार्थी व मुददा क्र.३ अंशता होकारार्थी कबुल केलेले आहे चौकशी अधिकारी तथा कामगार अधिकारी यांनी चौकशी अहवाल पुर्ण करून चौकशी अहवाल दि.१३/२/२०१९ रोजी सादर केला त्यानुसार जा.क्र.आस्थापना ०८ दि.२/४/२०१९ अन्वये श्री. सोमनाथ गोरक्षनाथ चव्हाण, लिपिक यांना १. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५६(२) च्या ५ प्रमणे रू.५०००/- दंड करणेत येत आहे. २. एक वेळेस सक्त ताकीद देणेत येत आहे अशी शिक्षा प्रस्तावीत करणेत आलेली आहे. व श्री. सोमनाथ गोरक्षनाथ चव्हाण , लिपिक यांचे माहे एप्रिल पेड मे २०१९ चे वेतन बिलातुन रू.५०००/- दंडाची रक्कम कपात करणेत आलेली आहे.

तरी मा.स्थायी समिती समोर यांनी श्री. चव्हाण यांचे दि.३/५/१९ रोजीचे अर्जावर प्रस्ताव सादर करण्यांचे निर्देश दिले आहेत त्यानुसार माहिती देण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५६ (४) अन्वये पोटकलम (१) च्या परंतुकाच्या खंड (ड) च्या तरतुदीच्या अधीन ज्या कोणत्याही नगरपालिका अधिका-यास किंवा कर्मचा-यास महानगरपालिके व्यतिरिक्त अन्व कोणत्याही प्राधिका-याकडून खालच्या पदावर आणण्यात आले असेल, काढुन टाकण्याचा किंवा बडतर्फे करण्यात आले असेल त्यास खालच्या पदावर आणण्याच, काढून टाकण्याचा किंवा बडतर्फ करण्याचा आदेश त्यास कळविल्या पासून एक महिन्याच्या आत ज्या प्रधिका-याने शास्ती लादली असेल त्याच्या निकट वरिष्ठ प्रधिका-याकडे अपील करता येईल आणि अपील प्रधिका-यास ज्या प्रधिका-याने शास्ती लादली असेल त्याच्याकडून अभिप्राय मिळावल्यानंतर दिलेला आदेश कायम करता येईल यात एखादी कमी शास्ती लादण्याच्या आदेशाचा समोवश होतो आणि अपील प्रधिका-याने दिलेला आदेश ताबडतोब अमलात येईल व तो निर्णयाक असेल.

पंरतु या पोट कलमाच्या प्रयोजनांसाठी स्थायी समिती आयुक्ताची निकट वरिष्ठ प्रधिकारी आहे असे मानले जाईल आणि महानगरपालिका स्थायीसमिती निकट वरिष्ठ प्रधिकारी आहे असे मानले जाईल अशी तरतुद आहे.

तरी श्री. सोमनाथ गोरक्षनाथ चव्हाण, लिपिक यांचा दि.३/५/२०१९ रोजीच्या अर्जावरील शेरांकानुसार माहिती सादर करण्यात येत आहे.

येणेप्रमाणे सहाय्यक आयुक्त आस्थापना यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- श्री.सोमनाथ गोरक्षनाथ चव्हाण,लिपिक यांचे शिस्तभंग कारवाई प्रकरणी केलेल्या शिक्षे विरूध्द केलेले अपील मा.स्थायी समिती समोर सादर करणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

**ठराव :-** मा.स्थायी समितीमध्ये झालेल्या चर्चे नुसार प्रशासनाने दिलेल्या शिक्षेचा सहानुभुतीपुर्वक फेरविचार करून नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.अविनाश घुले सही /-

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३

विषय क्रमांक- ७८ सोमवार दि.०९/०९/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार मालमत्ताधारक मुथ्था बिल्डर्स ॲण्ड कंन्स्ट्रक्शचे भागीदार जवाहरलाल मोहनलाल मुथ्था , रा. गणेश कॉलनी पाईप लाईन रोड, अ.नगर प्रभाग समिती क्रमांक-१ वॉर्ड क्र.७५ बिल क्र.६४ व बिल नं.६५ यांचे चुकीची आलेली ओपन प्लॉटवरील नळकनेक्शनची नोंद पाणीपटटी रक्कम शास्तीसह निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ सावेडी वसुली विभाग

संदर्भ- मुथ्था बिल्डर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टरचे भागीदार जवाहर मोहनलाल मुथ्था यांचा दि.३०/५/२०१४ चा अर्ज

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंती पुर्वक रिपोर्ट वसुली वॉर्ड क्र.७५ चे लिपिक यांजकडून देण्यात येतो की, जुना मालमत्ता क्र.७५/६४,७५/६५ मधील मालमत्ता धारक यांनी दि.३०/५/२०१४ रोजी इकडेस अर्ज देउन सदरची दोन्ही मालमत्ता या मोकळे भुखंड असुन सदर मालमत्तामध्ये कोणत्याही प्रकारचे कच्चे / पक्के बांधकाम नसुन सदर ठिकाणी नळ कनेक्शन घेतलेले नाही तरी नळ कनेक्शनची नोंद व त्यावरील शास्तीची रक्कम कमी करून मिळणेबाबत अर्ज केलेला आहे.

उक्त अर्जामध्ये मनपा फिटर यांनी दि.१/८/२०१८ रोजी समक्ष पाहणी करून सदरच्या मालमत्ता मध्ये कोणतेही नळ कनेक्शन नसले बाबतचा अहवाल दिलेला आहे.

तरी मालमत्ताधारक यांनी दि.३०/५/२०१४ रोजी दिलेल्या अर्जाप्रमाणे व मनपा फिटर यांनी दि.१/१/२०१८ रोजी दिलेल्या अहवाल प्रमाणे मालमत्ता क्र.७५/६४ व मालमत्ता क्र.७५/६५ वरील पाणीपटटीची नोंद व त्यावरील आकारण्यात आलेली शास्ती अर्ज दिलेल्या तारखेपासून रद्द करणेस व तशी संगणक प्रणालीमध्ये दुरूस्ती करणेस आदेशार्थ रिपोर्ट सादर.

येणेप्रमाणे वसुली लिपिक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, वसुली लिपिक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मालमत्ताधारक श्री. मुथ्था बिल्डर ॲण्ड कॉन्ट्रॅक्टरचे भागीदार जवाहर मोहनलाल मुथ्था वसुली वॉर्ड क्र.७५ यांच्या नळ कनेक्शन बाबत मनपा फिटर यांच्या अहवाल नुसार नळ कनेक्शनची नोंद आढळुन येत नसल्याने पाणीपटटीची कर आकारणी कमी करणे उचित वाटते तथापी आदेशार्थ सादर.

यावर प्रभाग समिती अधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर रिव्हीजन विभाग यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार मालमत्ता धारकाकडे नळजोड नसतांना पाणीपटटीची आकारणी झालेली आहे त्यानुसार नळ फिटर यांनी समक्ष जागेची पहाणी करून शाख अभियंता यांचे अभिप्रायासह नळ जोडणी होत असलेली आकारणी कमी करण्यास कलम १५२ नुसार रू.२७०००/- दोन नळजोडणी झालेली आकारणी निर्लेखित करण्यास मान्यता देता येईल.

यावर मा.उपायुक्त कर यांचा अभिप्राय की, रक्कम निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समितीपुढे पाठविणेसाठी प्रस्ताव तयार करावा तसेच तत्पूर्वी पाणीपटटी वगळता इतर सर्व करांची वसुली (थकबाकीसहीत) करावी./अ

यावर प्रभाग अधिकारी याचां अभिप्राय की, फेरसादर मा.उपायुक्त (कर) साहेब यांच्या दिनांक २१/६/२०१९ च्या आदेशान्वये मालमत्ता धारक यांनी बील क्र.६४ ची घरपटटी व त्यावरील शास्तीसह

रूपये १७०००/- पा.नं. AS /४२४२२ दिनांक ६/८/२०१९ ने घरपटटीचा भरणा केलेला आहे. बील नं. ६५ ची घरपटटी व त्यावरील शास्तीसह रूपये १७५००/- पा.नं. AS /४२४२१ दिनांक ६/८/२०१९ ने भरणा केलेला असुन सोबत पावत्यांची झेरॉक्स प्रत जोडत आहे. सदर बाबतचा अहवाल आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे प्रभाग अधिकारी क्र. १ यांचा फेरसादर असे

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, पूर्वपृष्ठावरील "अ" नुसार आकारणी केलेली रक्कम निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठविणेसाठी मान्यता मिळणेकामी सादर.

यावर मा. आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ताधारक मुथ्था बिल्डर्स ॲण्ड कंन्स्ट्रक्शचे भागीदार जवाहरलाल मोहनलाल मुथ्था , रा. गणेश कॉलनी पाईप लाईन रोड, अ.नगर प्रभाग समिती क्रमांक-१ वॉर्ड क्र.७५ बिल क्र.६४ व बिल नं.६५ यांचे चुकीची आलेली ओपन प्लॉटवरील नळकनेक्शनची नोंद पाणीपटटी रक्कम शास्तीसह निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्टआहे.

मा.सौ.संध्या पवार :- विषय क्रमांक ७८ ते ८०सदर विषय घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असल्याने विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ताधारक मुथ्था बिल्डर्स ॲण्ड कंन्स्ट्रक्शचे भागीदार जवाहरलाल मोहनलाल मुथ्था , रा. गणेश कॉलनी पाईप लाईन रोड, अ.नगर प्रभाग समिती क्रमांक-१ वॉर्ड क्र.७५ बिल क्र.६४ व बिल नं.६५ यांचे चुकीची आलेली ओपन प्लॉटवरील नळकनेक्शनची पाणीपटटी रक्कम निर्लेखित करणेबाबतच्या ऑफिस रिपार्टस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अर्जदार मालमत्ताधारक मुथ्था बिल्डर्स ॲण्ड कंन्स्ट्रक्शचे भागीदार जवाहरलाल मोहनलाल मुथ्था , रा. गणेश कॉलनी पाईप लाईन रोड, अ.नगर प्रभाग समिती क्रमांक-१ वॉर्ड क्र.७५ बिल क्र.६४ व बिल नं.६५ यांचे चुकीची आलेली ओपन प्लॉटवरील नळकनेक्शनची पाणीपटटी रक्कम निर्लेखित करणेबाबतच्या ऑफिस रिपार्टस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.संध्या पवार सही /-

अनुमोदक :- मा.सौ.दिपाली बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-<br>सभापती<br>स्थायी समिती<br>अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- ७९ सोमवार दि.०९/०९/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार मालमत्ताधारक सौ. छाया नानासाहेब म्हस्के, रा. सोनचाफा कॉलनी, बोल्हेगाव ,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.६८ , बिल क्र.२ यांचे चुकीची आलेली पाणीपटटी रक्कम शास्तीसह निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ नागापूर विभाग

विनंती रिपोर्ट नागापूर उपविभाग वसुली लिपिक वॉर्ड क्र.६८ यांजकडुन देण्यात येतो की, अर्जदार सौ. छाया नानासाहेब म्हस्के यांनी श्री.अजि अल्लाबक्ष शेख यांच्याकडून सर्व्हे नं.७९/१ अ प्लॉट नं.२ मधील ७८ चौ.मी. (Z१६८०२८८०४) क्षेत्र व त्याच प्लॉट मधील उर्वरित क्षेत्र ५४.३६ चौ.मी. (Z१६८०२८८०५) श्री. ज्ञानेश्वर चंद्रकांत गुंजकर असे आम्ही दोघांनी खरेदी घेतले असुन त्याची सन २००३ ते २०१२ पर्यत संपुर्ण पाणीपटटी भरलेली आहे. त्यानंतर सदरचे नळ कनेक्शन ज्ञानेश्वर चंद्रकांत गुंजकर यांच्या प्लॉटवर असुन त्यांनीही वर्ष २०१२ ते २०२० पर्यत संपुर्ण पाणीपटटी भरलेली आहे. परंतु माझ्या प्लॉटवर पुर्वीही नळ कनेक्शन नव्हते व आजही नाही तरी मला श्री. अजित अल्लाबक्ष शेख यांच्या नावाने रू.४७,४९०/- चे बिल आकारले आहे. सदरचे बिल चुकीचे असुन ते रद्द करणेबाबत अर्ज मनपा कार्यालयात दाखल केला आहे.

त्याकरिता वॉर्ड क्र.६८ चा मनपा अभिलेख तपासणी केली असता श्री. अजित अल्लाबक्ष शेख यांच्या नावे सोनचाफा रौ. हौ. बोल्हेगांव मध्ये शेजारी शेजारी १. वॉर्ड क्र.६८ बिल नं. २ (Z१६८०२८८०४) व २. वॉर्ड नं.६८ बिल नं.३(Z१६८०२८८०५) अशा दोन मालमत्ता होत्या व त्यांना एकच मालक असल्याने एक नळ कनेक्शन होते. परंतु सदर पुर्वीचे मिळकतधारक श्री. अजित अल्लाबक्ष शेख यांनी त्यांच्या दोन्ही मिळकती सन २००७ मध्ये १. मालमत्ता अर्जदार सौ. छाया नानासाहेब म्हस्के व २. मालमत्ता श्री. ज्ञानेश्वर चंद्रकांत गुंजकर असे दोन वेगवेगळे मिळकतधारक यांना खरेदी दिल्याचे कागदपत्रावरून दिसुन येत आहे. श्री. ज्ञानेश्वर चंद्रकांत गुंजकर यांच्या नावे पाणी कनेक्शनची नोंद असुन त्यांना पा.नं. AS /१०५६९ दिनांक २१/०४/२०१९ ने रू.२३१३ /- ने सन २०१९-२०२० अखेर संपुर्ण पाणीपटटी व घरपटटी चा भरणा केला आहे. सन २००७-२००८ मध्ये घरपटटी व पाणीपटटी बिले संगणीकृत एकत्रित करत असताना सदर पाणीपटटीची नोंद श्री. ज्ञानेश्वर चंद्रकांत गुंजकर या नावाने संगणकावर घेण्यात आलेली असुन नजरचुकीने WT मधील Z१६८००००५८ ही नोंद रद्द करण्या ऐवजी सदरची नोंद तशीच पुढे चालु राहिली आहे.

त्याकरिता अर्जदार यांच्या अर्जाप्रमाणे मिळकतीच्या कागदपत्रांची पाहणी केली असता तसेच मिळकतीचे म्यु. पाणी पुरवठा फिटर यांनी दिनांक ६/८/२०१९ रोजी समक्ष स्थळ पाहणी रिपोर्टनुसार सदर ठिकाणी नळ कनेक्शन आढळुन आले नाही.

त्याकरिता सदर नळ कनेक्शनधारकाचे श्री.अजित अल्लाबक्ष शेख WT पाणीपटटी बिल नं. Z१६८००००५८ रू.४७,४९०/- +शास्ती प्रस्ताव मंजुर होईपर्यत मुंबई प्रांतिक मनपा अधि.१९४९ चे कलम १५२ नुसार रक्कम निर्लेखित करून बिल रद्द करण्यास मंजुरीस्तव सविनय सादर.अ/

येणेप्रमाणे वसुल लिपिक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, वसुली लिपिक यांचे प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे तसेच पा.पु. फिटर यांचे स्थळ पाहणी रिपोर्ट नुसार पाणीपटटी कराचे बिल निर्लेखित करण्यास सविनय सादर.

यावर प्रभाग अधिकारी क्र.१ यांचा अभिप्राय की, कर निरीक्षक यांचा अभिप्राय तसेच म्यु. फिटर यांचा प्रत्यक्ष पाहणी अहवाल व वसुली लिपिक यांच्या प्रस्तावानुसार जादा झालेली पाणीपटटी निर्लेखित करणे उचित होईल.

यावर रिव्हीजन विभाग यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार सन २००८ या वर्षापुर्वी पाणीपटटीची बिले स्वतंत्र तयार करून वाटप करण्यात येत होते. सन २००८ च्या नंतर पुन्हा मालमत्ता कराच्या बिलात पाणीपटटी ची रक्कम समाविष्ठ केली होती त्यानुसार नियमित कराचा भरणा करत आहे. स्वतंत्र पाणीपटटीचे बिल सन २००८ मध्ये ज्या वेळेस मालमत्ता कराच्या मागणी समाविष्ठ केले होते. त्यावेळे स्वतंत्र पाणीपटटीचे मागणी बिल रद्द करणे आवश्यक होते. परंतु तसे न होता आजतागायत पाणी पटटीचे मागणी बिल पाणी पुरवठा मध्ये सुरू आहे. सदर पाणीपटटीच्या मागणी बिलाची रक्कम वसुल न होणारी असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधि.१९४९ कलम १५२ नुसार मा.स्थायीसमितीच्या मान्यतेने निर्लेखित करणे विषयी व सदरच्या प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे ठेवणे विषयी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीतप्रमाणे T-१ वरील "A" मधील बिल नस्तीत सादर करणेच्या अटीस अधिन राहून "A" मधील रक्कम रू.४७,४९०/- + शास्ती याची रक्कम निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठविणेत हरकत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ताधारक सौ. छाया नानासाहेब म्हस्के, रा. सोनचाफा कॉलनी, बोल्हेगाव ,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.६८ , बिल क्र.२ यांचे चुकीची आलेली पाणीपटटी रक्कम शास्तीसह निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्टआहे.

मा.सौ.संध्या पवार :- विषय क्रमांक ७८ ते ८०सदर विषय घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असल्याने विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ताधारक सौ. छाया नानासाहेब म्हस्के, रा. सोनचाफा कॉलनी, बोल्हेगाव ,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.६८ , बिल क्र.२ यांचे चुकीची आलेली पाणीपटटी रक्कम शास्तीसह निर्लेखित करणेबाबतच्या ऑफिस रिपार्टस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अर्जदार मालमत्ताधारक सौ. छाया नानासाहेब म्हस्के, रा. सोनचाफा कॉलनी, बोल्हेगाव ,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.६८ , बिल क्र.२ यांचे चुकीची आलेली पाणीपटटी रक्कम शास्तीसह निर्लेखित करणेबाबतच्या ऑफिस रिपार्टस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.संध्या पवार सही /-

अनुमोदक :- मा.सौ.दिपाली बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- ८० सोमवार दि.०९/०९/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-**अर्जदार मालमत्ताधारक श्री. सतिष रामलालजी छाजेड, रा. अमोल पॅराडाईज शेजारी बंगला नं.१३सावेडी ,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.४९, बिल क्र. ११४९ या बिलातील मालमत्ता कराची आकारणी केलेली अवाजवी घरपटटी रक्कम शास्तीसह निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ सावेडी

विषय- दि.११/३/२०१९ रोजीच्या पत्रा संदर्भा बददल घरपटटी अवाजवी लावल्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये वॉर्ड नं.४९ चे वसुली लिपिक यांच्याकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड नं. ४९ बिल क्रमांक ११४९ चे मालमत्ता धारक श्री. सतिष रामलाल छाजेड, रा. अमोल पॅराडाईज शेजारी बंगला नं.१३ सावेडी, अहमदनगर यांनी दिनांक २२/३/२०१९ रोजीच्या अर्जात कळविले आहे की मझे घराचे बांधकाम हे सन २०१४ पर्यत पुर्ण झालेले आहे. तसेच तळ मजल्यास आकारण्यात आलेली वाणीज्य घरपटटी कमी करून रहिवास दराने दयावी ही विनंती.

अर्जदार यांचा दिनांक २२/३/२०१९च्या अर्जानुसार सदर मिळकतीची दि.९/४/२०१९ च्या अर्जानुसार सदर मिळकतीची दि.९/४/२०१९ रोजी पाहणी केली असता तळ मजल्यास किरणा मालाचा वापर आहे. तसेच अर्जदार यांनी बांधकाम करण्याससाठी बॅकेकडुन २०११ मध्ये कर्ज घेतल्याचे कागदपत्र व इमारतीचे बांधकाम अपुर्ण असल्याचे फोटो झोरॉक्स अर्जासोबत जोडले आहेत.त्या अनुषंगाने सदर इमारतीचे बांधकाम सन २०१४ मध्ये पुर्ण झालेचे बाबत वास्तुशांती पत्रीका सोबत जोडले आहे.

तरी सदर मिळकतीस सन २००९ पासून आकारण्यात आलेली घरपट्टी कमी करून सन २०१४ पासुन करआकारणी करणे बाबत संगणक विभागा व कर संकलन विभागास आदेश व्हावेत.पुढील ओदशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,वसुली लिपीक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मालमत्ता धारक श्री.सतिष रामलाल छाजेड यांना मनपा बांधकाम परवानगी नुसार सन २००९-१० या आर्थिक वर्षापासुन कर आकारणी करण्यात आली होती.परंतु आर्थिक कारणामुळे सन २००९-१० या आर्थीक वर्षामध्ये बांधकाम पुर्ण झाले नसल्याने सदर बांध्काम सन २०१४-१५ या आर्थीक वर्षात पुर्ण झाले असल्याने महाराष्ट महानगरपालिको अधिनियम १९४९मधील कलन २०(१)(ड) अन्वये कर आकारणी दुरूस्ती करणे उचित वाटते तथापी आदेशार्थ सादर.

यावर प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र.१ यांचा अभिप्राय की,कर निरीक्षक यांचा अभिप्राय तसेच कागदपत्रांची केलेली पहाणी वसुली लिपीक यांच्या प्रस्तावानुसार कर आकारणी कमी करणे उचित वाटते.

यावर मुल्यनिर्धारण व करसंकलन अधिकारी यांचा अभिप्राय की,सुनावणी देणे

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,सहाय्यक मुल्यनिर्धारक कर संकलन अधिकारी तथा रिव्हीजनविभाग यांच्या अभिप्रायानुसार सदर प्रस्तावास सुनावणीस ठेवणेबाबत कळविले आहे.तरी सुनावणीची तारीख व वेळ मिळण्यास आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,

१. सन २००९ते २४/१२/२०१४ किंवा ३१/०३/२०१६ पर्यतचे बिल किती त्याची आर.व्ही.किती होती.
२. सन २०१४-१५ पासून (१ एप्रिल १४ ते ३१ मार्च २०१५ ची आर.व्हि. किती होती)

३. जाने २०१५ ते ३१/३/२०१५ तसेच १/४/२०१५ ते ३१/०३/१९ पर्यतची आकारणी किती होती त्याची रक्कम
४. २००९ ते ३१/३/१४ पर्यतची रक्कम थकबाकी व शास्तीसह किती होती
५. १/४/१५ ते ३१/३/१९ पर्यतची थकबाकी रक्कम शास्तीसह किती होते.यापुर्वी भरलेली असलेस त्याची रक्क्म दर्शवून
६. बांधकाम परवानगी व Completion Certificate घेतले असलेस सादर करावे.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,फेरसादर वरील प्रमाणे ओदशीत केलेल्या १ ते ६ मुद्देनुसार सन २००९ ते २०१४ पर्यतचा बीलाचा कर निहाय तक्ता व करयोग्य मुल्य सादर केलेसह एकुण थकबाकी दर्शविण्यात आले आहे.तसेच सदर मालमत्ता धारकाने थकबाकी पोटी कुठलीही कराची रक्कम भरलेली नाही व भोगवटा दाखला मंजुरी घेतलेली .तरी पुढील आदेशार्थ सविनय सादर.

यावर वसुली लिपिक यांना अभिप्राय की, सोबत बांधकाम परवानगी मंजूरी प्रमाणपत्र व प्लॅन सादर केलेला आहे.

यावर प्रभाग अधिकारी क्र.१ याचां सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, सुनावणी दि.१८/७/२०१९ रोजी सकाळी ११.०० वा. ठेवावी अर्जदारांस संपुर्ण कागदपत्रासाहित बोलवले.

यावर प्रभाग अधिकारी क्र.१/ वसुली क्लार्क यांचा अभिप्राय की, आज दि.१८/७/२०१९ च्या सुनावणी मध्ये बांधकामासाठी कर्ज मंजूर केलेले कागदपत्र सादर करण्याबाबत मा.उपायुक्त साहेब यांनी आदेशीत केले व त्यानंतर पुढील हेरींग घेण्यात येईल.आज दि.६/८/२०१९ रोजी घराच्या बांधकामासाठी घेतलेले कर्ज २०१४ मध्ये रिजिव्हल करून घेतले बाबत बँकेचे गहाण / खत सादर केले आहे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, सोबतच्या तक्त्यामधील ३१/३/२०१४ पर्यतची थकबाकी शास्तीसह रू.१,३८,४८७.५०/- आहे ती रक्कम निर्लेखित करणेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेस पाठविणेस हरकत नाही./ अ

मा.स्थायी समितीचा निर्णय झालेनंतर १ एप्रिल २०१४ ते ३१ मार्च २०१५ पर्यतची आकारणी + शास्ती व तक्त्यामधील २०१५ ते ३१/०३/२०१९ पर्यतचे बिल रू.१,३८,४८७/- याची बेरीज करून होणारी रक्कमेचे बिल सुधारित करून दिलेनंतर ते भरणेनंतरच २०१९-२०२० चे बिला पाठवून पुढील कार्यवाही केली जाईल.

उपरोक्त "अ" मध्ये नमूद कार्यवाहीत मान्यता मिळणेकामी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ताधारक श्री. सतिष रामलालजी छाजेड , रा. अमोल पॅराडाईज शेजारी बंगला नं.१३ सावेडी , अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र. ४९ , बिल क्र. ११४९ या बिलातील मालमत्ता कराची आकारणी केलेली अवाजवी घरपटटी रक्कम शास्तीसह निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.सौ.संध्या पवार :- विषय क्रमांक ७८ ते ८०सदर विषय घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे असल्याने विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- विषय पत्रिकेतील घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ताधारक श्री. सतिष रामलालजी छाजेड , रा. अमोल पॅराडाईज शेजारी बंगला नं.१३ सावेडी , अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र. ४९ , बिल क्र. ११४९ या बिलातील मालमत्ता कराची आकारणी केलेली अवाजवी घरपटटी रक्कम शास्तीसह निर्लेखित करणेबाबतचाऑफिस रिपार्टस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अर्जदार मालमत्ताधारक श्री. सतिष रामलालजी छाजेड , रा. अमोल पॅराडाईज शेजारी बंगला नं.१३ सावेडी , अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र. ४९ , बिल क्र. ११४९ या बिलातील मालमत्ता कराची आकारणी केलेली अवाजवी घरपटटी रक्कम शास्तीसह निर्लेखित करणेबाबतचा ऑफिस रिपार्टस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.संध्या पवार सही /-

अनुमोदक :- मा.सौ.दिपाली बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- ८१ सोमवार दि.०९/०९/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॅरिअर गायडन्स सेंटर करीता सावेडी येथील सावित्रीबाई फुले भाजी मार्केट वरील हॉल क्र.१३ भाडे तत्वावर मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका मार्केट विभाग.

**संदर्भ :-** प्रबोधन फौंडेनशन, अहमदनगर यांचा दि.२४/०९/२०१८ रोजीचा अर्ज

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॅरिअर गायडन्स सेंटर करीता सावेडी येथील सावित्रीबाई फुले भाजी मार्केट वरील हॉल क्रमांक १३ भाडे तत्वावर मिळणेबाबत प्रबोधन फौडेनशन , अहमदनगर यांचा दि.२४/९/२०१८ रोजीचा अर्ज इकडेस प्राप्त झाल्यानुसार सदर हॉलचे भाडे ठरवून मिळणेबाबत कळविले असता त्यांनी जा.क्र. न.र.४३०९ दि.२६/८/२०१९ अन्वये सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल भाजी मार्केट वरील हॉल क्रमांक १३ चे चटई क्षेत्र १२.९६ चौ.मी. बांधकाम क्षेत्र १७.७४ चौ.मी. करीता दरमहा भाडे रूपये ४,२५०/- घेणे योग्य होईल . तसेच मा. महासभेने केलेल्या ठरावानुसार अनामत रक्कम घेणे योग्य होईल असा अभिप्राय दिलेला आहे.

तरी अहमदनगर महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल भाजी मार्केट वरील हॉल क्रमांक १३ चे चटई क्षेत्र १२.९६ चौ.मी. बांधकाम क्षेत्र १७.७४ चौ.मी. करीता दरमहा भाडे रूपये ४,२५०/-(करा विरहीत) तसेच दरमहा भाडे रूपये ४२५०/- x१२ महिने = ५१,०००/- अनामत रक्कम घेवून नेहमीच्या अटी व शर्तीनुसार ११ वर्षे कराराने प्रबोधन फौंडेशन, अहमदनगर यांस हॉल देणे बाबत सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर घेणेबाबत रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर./अ

येणेप्रमाणे प्र.मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (सा) यांची अभिप्राय की, उपरोक्त "अ" मधील प्रस्तावास असहमत आहे त्यामुळे ADTP यांनी ठरविलेल्या भाडे मुल्यांकनानुसार व महासभेने ठरविलेल्या अनामत सकमेनुसार सदर हॉल लिलाव पदधतीने प्रथमतः तीन वर्षासाठी भाडे पटटयाने देणे उचित होईल त्यानुसारच प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करणेसाठी निर्णयार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्य

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

सभापती साहेब :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॅरिअर गायडन्स सेंटर करीता सावेडी येथील सावित्रीबाई फुले भाजी मार्केट वरील हॉल क्र.१३ भाडे तत्वावर मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- महानगरपालिकेच्या मालकीच्या ब-याच मालमत्ता पडून असून त्यापासुन कोणतेही उत्पन्न महानगरपालिकेस मिळत नाही.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीसाठी शहर हद्दीमध्ये असलेल्या महानगरपालिकेच्या मालकीच्या मोकळया जागा व गाळे भाडेतत्वावर देण्यात करीता निविदा प्रक्रीया किंवा लीलाव पध्दतीने राबविण्यात यावी.

मार्केट विभाग प्रमुख :- वेळोवेळी लिलाव प्रक्रीया राबविण्यात आल्यानंतर भाडे व डिपॉझिटची आकारणी पहाता त्यास प्रतिसाद मिळत नाही हा पुर्व अनुभव आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- सध्या या इमारतीमधील सर्व हॉल रिकामे आहेत.इमारतीच्या दारे खिडक्या चोरी गेल्या आहेत.काचा फुटल्या आहेत.रात्रीच्या वेळी या इमारतीमध्ये अनेक अवैध धंदे चालतात.या इमारतीपासुन महानगरपालिकेस सध्या कोणतेही उत्पन्न मिळत नाही.कारण आपण भाडे व डिपॉझिट रेडीरेकनर नुसार आकारण्यात येत असल्याने कोणीही भाडयाने हॉल घेण्यास तयार नाही.सदर संस्थेने भाडयाने घेणे बाबत मागणी केली आहे.सदर संस्था सामाजीक काम करीत असल्याने संस्थेकडून नियमानुसार भाडे आकारणी करून नाममात्र रक्कम रूपये ११,०००/- झिपॉझिट घेण्यात यावे.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- अहमदनगर महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल भाजी मार्केट वरील हॉल क्रमांक १३ चे चटई क्षेत्र १२.९६ चौ.मी. बांधकाम क्षेत्र १७.७४ चौ.मी. करीता दरमहा भाडे रूपये ४,२५०/-(करा विरहीत) तसेच सामाजीक संस्था असल्याने नाममात्र अनामत रक्कम घेवून अटी व शर्तीनुसार ११ वर्षे कराराने डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॅरिअर गायडन्स सेंटर करीता प्रबोधन फौंडेशन, अहमदनगर यांस हॉल भाडेतत्वावर देण्यात यावा.

मा.सौ.संध्या पवार :- अहमदनगर महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल भाजी मार्केट वरील हॉल क्रमांक १३ अटी व शर्तीनुसार ११ वर्षे कराराने डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॅरिअर गायडन्स सेंटर करीता प्रबोधन फौंडेशन, अहमदनगर यांस हॉल भाडेतत्वावर देण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल भाजी मार्केट वरील हॉल क्रमांक १३ चे चटई क्षेत्र १२.९६ चौ.मी. बांधकाम क्षेत्र १७.७४ चौ.मी. करीता दरमहा भाडे रूपये ४,२५०/-(करा विरहीत) तसेच सामाजीक संस्था असल्याने नाममात्र अनामत रक्कम घेवून अटी व शर्तीनुसार ११ वर्षे करारानेडॉ.बाबासाहेब आंबेडकर कॅरिअर गायडन्स सेंटर करीता प्रबोधन फौंडेशन, अहमदनगर यांस हॉल भाडेतत्वावर देण्यास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल भाजी मार्केट वरील हॉल क्रमांक १३ चे चटई क्षेत्र १२.९६ चौ.मी. बांधकाम क्षेत्र १७.७४ चौ.मी. करीता दरमहा भाडे रूपये ४,२५०/-(करा विरहीत) सामाजीक संस्था असल्याने नाममात्र अनामत रक्कम घेवून अटी व शर्तीनुसार ११ वर्षे कराराने डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॅरिअर गायडन्स सेंटर करीता प्रबोधन फौंडेशन, अहमदनगर यांस हॉल भाडेतत्वावर देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ.दिपाली बारस्कर सही /-

अनुमोदक :- मा.सौ.संध्या पवार सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- ८२ सोमवार दि.०९/०९/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** नागरी दलितवस्ती सुधार योजना सन २०१८-२०१९ ई - निविदा क्र.२०७७ या निविदेच्या अंतर्गत प्र.क्र.१४ मधील शांतीनगर अंतर्गत सोनवणे ते अडागळे रस्ता कॉंक्रीटीकरण करणे व खुली जागा विकसित करणे मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग.

उपरोक्त विषयान्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. प्रशासकीय मान्यता- मा.जिल्हाधिकारी,अ.नगर यांची जा.क्र.न.पा./कार्या.६ अ/७५४/२०१९

२. ऑनलाईन ई-निविदा क्र.- २०७७/सन २०१८-१९ दि.०३/०७/२०१९

३. निविदा विक्री कालावधी- दि.०३/०७/२०१९ ते दि.१७/०७/२०१९

४. निविदा स्विकारणेचा कालावधी- दि.१८/०७/२०१९ ते दि.२२/०७/२०१९

५. निविदा उघडण्याचा दिनांक- २२/०७/२०१९

६. कामाची मुदत- ४ महिने

७. प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल- दि.०७/०८/२०१९ च्या तांत्रिक छाननीनुसार

| ई-निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| सा.बां.वि. /ई-निविदा क्र.२०७७ / २०१९-२० | प्रभाग क्र.१४ मधील शांतीनगर अंतर्गत सोनवणे ते अडागळे रस्ता कॉंक्रीटीकरण करणे व खुली जागा विकसित करणे | ३१,११,१११/- | यश कंन्स्ट्र ॲण्ड सप्लायर्स अ.नगर | निविदा दरापेक्षा ०.०१% कमी दराने | यश कंन्स्ट्र ॲण्ड सप्लायर्स अ.नगर यांचे दर निविदा दरापेक्षा ०.०१% कमी दराने |
| | | | श्री.राजेंद्र लक्ष्मण लोणकर, अहमदनगर | निविदा दरापेक्षा ०.००% जादा दराने | |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्टया रकाना क्र.५मध्ये नमुद निविदाधारक यश कन्स्ट्र. ॲण्ड सप्लायर्स अ.नगर यांची निविदा,नविदा दरापेक्षा ०.०१% इतक्या कमी दराची आहे.

तरी सदरचे दर वाजवी असून यश कंन्स्ट्रक्शन ॲण्ड सप्लायर्स ,अ.नगर यांची निविदा दरापेक्षा ०.०१ टक्के कमी दराची निविदा निविदा मंजूरीकसाठी मा.स्थायी समितीकडेस पाठविणेस्तव सदरचा ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,प्रस्तावानुसार यश कंन्स्ट्र. ॲण्ड सप्लायर्स अ.नगर यांचे निविदा दर सर्वात कमी मात्र निविदा दरापेक्षा ०.०१ टक्के कमी दराची असलेने मान्य करणे योग्य.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,सार्व.बांधकाम विभागाचे शासन निर्णय दि.२८/११/१८ प्रमाणे रू.५००/- प्रतिज्ञापत्रा सोबत नाही.विभागाने पुर्तता करावी.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ७ मधील कलम ७३- ड प्रमाणे कार्यावाही करावी मा.पृष्ठ क्र टि -१२ वरील अ प्रमाणे ०.०१ कमी दराची निविदा मान्यतेस्तव सादर.

यावर उपअभियांता याचा अभिप्राय की,त्रुटींचे पुर्तते सह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

यावर मा.शहर अभियंता यांची स्वक्षरी

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, पृष्ठ क्र.टि -१२ वरील अ मध्ये प्रस्तावित केल्यानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- नागरी दलितवस्ती सुधार योजना सन २०१८-२०१९ ई - निविदा क्र.२०७७ या निविदेच्या अंतर्गत प्र.क्र.१४ मधील शांतीनगर अंर्तगत सोनवणे ते अडागळे रस्ता कॉक्रीटीकरण करणे व खुली जागा विकसित करणे मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- ऑफिस रिपोर्ट वाचा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.

मा.सौ.आशा कराळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.गणेश भोसले :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- नागरी दलितवस्ती सुधार योजना सन २०१८-२०१९ ई - निविदा क्र.२०७७ या निविदेच्या अंतर्गत प्र.क्र.१४ मधील शांतीनगर अंर्तगत सोनवणे ते अडागळे रस्ता कॉक्रीटीकरण करणे व खुली जागा विकसित करणे मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका नागरी दलीतवस्ती सुधार योजना सन २०१९-२० अंतर्गत ई - निविदा क्र.२०७७ अंतर्गत प्रभाग क्र.१४ मधील शांतीनगर अंतर्गत सोनवणे ते अडागळे रस्ता कॉक्रीटीकरणे करणे व खुली जागा विकसित करणे कामा करीता यश कंन्स्ट्र. ॲण्ड सप्लायर्स अ.नगर निविदाधारक यश ंकन्स्ट्र. ॲण्ड सप्लायर्स अ.नगर यांची निविदा,नविदा दरापेक्षा ०.०१% इतक्या कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.आशा कराळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- ८३ सोमवार दि.०९/०९/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणा-या घनकच-यावर बुरुडगांव स. नं. ३४ या ठिकाणी दैनदिन १०० मे.टन क्षमतेचा (Processing Plant १०० TPD at Burudgaon ) मशिनरी उभारणे व पाच वर्षाकरीता देखभाल व दुरुस्ती बाबत फेर ई- निविदा क्र.२१२१ अन्वये मागविण्यात आलेल्या ई -निविदेचा लिफाफा क्र.२ दराबाबतचा तुलनात्मक तक्ता मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रकल्प विभाग

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणा-या घनकच-यावर बुरुडगांव स. नं. ३४ या ठिकाणी दैनदिन १०० मे.टन क्षमतेचा (Processing Plant १०० TPD at Burudgaon ) मशिनरी उभारणे व पाच वर्षाकरीता देखभाल व दुरुस्ती बाबत एजन्सीची नियुक्ती करणे साठी ई- निविदा क्र.२१२१ अन्वये निविदा मागविण्यात आली आहे. सदर ई- निविदेमध्ये दोन निविदा प्राप्त झाल्या आहेत.सदर निविदेचा तांत्रिक लिफाफा क्र. १ छाननी समितीकडेस दिनांक ०४/०९/२०१९ रोजी सादर करण्यात आला असता दोन्ही निविदाकाराने आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा व्यापारी लिफाफा उघडणे बाबत छाननी समितीने शिफारस केली आहे.सदर बाबत दोन्ही निविदाकाराचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आला असता त्यामधील दराबाबतचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

**Comparative offer for the work of Processing Plant 100 TPD at Burudgaon, Ahmednagar**

**Brief comparison**

| | Particulars | Mayo Vessels and Machines Pvt Ltd | Mailhem Ikos Environment Pvt. Ltd. |
|---|---|---|---|
| A | Cost of Mahinery | 405.00 | 221.20 |
| | | | |
| B | Processing for 5 Years | 1,080.40 | 1,441.14 |
| | | | |
| | **Total Basic** | **1485.40** | **1,662.34** |
| | | | |
| Add | GST | | |
| | As applicable | | |
| | | | |
| | **Total Amount Excluding GST** | **1485.40** | **1,662.34** |

**Cost analysis for Machinery and O&M for 5 years**

| | Particulars | Mayo Vessels and Machines Pvt Ltd | Mailhem Ikos Environment Pvt. Ltd. |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | A) Cost of Machinery | | |
| | Basic | 405.00 | 221.20 |
| Add | GST | | |
| | As applicable | - | - |
| | | | |
| | Total Amount of Machinery | 405.00 | 221.20 |
| | | | |
| | | | |
| | B) Processing for 5 y | **Rs. 592/-** | Rate quotated (144114000/182500) Rs.789.66 Royalty 34,000 per month to be given to AMC by thre Agency |
| | Basic | 1,080.40 | 1,441.14 |
| | (100 Ton/Day X 365 day X 5 Y =182500/Ton) | | |
| Add | GST | | |
| | As applicable | | |
| | | | |
| | Total Amount of Machinery | 1,080.40 | 1,441.14 |
| | | | |
| | | | |
| | Total Basic | **1485.40** | 1,662.34 |
| | Total GST | - | - |
| | **Total Quotated Amt** | **1485.40** | **1,662.34** |

त्यानुसार वरील प्रमाणे दोन निविदांची तुलना करता Mayo Vessels and Machines Pvt Ltd या एजन्सीने मशिनरी पुरविणेचे दर रु. ४०५.०० लक्ष इतके नमुद केले आहेत व Mailhem Ikos Environment Pvt. Ltd. या एजन्सीने मशिनरी पुरविणेचे दर रु.२२१.२० लक्ष इतके नमुद केले आहेत. ५ वर्षाकरीता देखभाल व दुरुस्तीबाबत Mayo Vessels and Machines Pvt Ltd या एजन्सीचे दर प्रति मे.टन ५९२/- (इनपुट बेसीस ) इतके नमुद केले आहेत व Mailhem Ikos Environment Pvt. Ltd या एजन्सीचे दर प्रति मे.टन ७८९.६६ (इनपुट बेसीस ) इतके नमुद केले आहेत.

त्यानुसार मशिनरी पुरविणे व ५ वर्षाकरीता देखभाल दुरुस्ती बाबत एकत्रित दर पहाता Mayo Vessels and Machines Pvt Ltd या एजन्सीचे दर रु.१४८५.४० लक्ष इतके आहेत व Mailhem Ikos Environment Pvt. Ltd या एजन्सीचे दर रु.१६६२.३४ लक्ष इतके आहेत. त्यानुसार एकत्रित दर पहाता Mayo Vessels and Machines Pvt Ltd या एजन्सीचे दर तुलनात्मक दृष्ट्या कमी येत आहेत. अहमदनगर महानगरपालिकेचा स्वच्छ भारत अभियान अंतर्गत मंजुर करण्यात आलेला सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये १०० मे.टन क्षमतेचा MSW

Processing Plant मशिनरी पुरविणे करीता ३०६.८८ लक्ष इतकी नमुद करण्यात आली आहे व प्राप्त निविदेमधील तुलनात्मक दृष्ट्या कमी दर नमुद केलेले Mayo Vessels and Machines Pvt Ltd यांनी मशिनरी पुरविणे कामी रु. ४०५.०० लक्ष इतके दर नमुद केले आहेत व दरचे दर अवाजवी आहेत.

सदर बाबत दिनांक ५/९/२०१९ रोजी मा.आयुक्त यांच्याकडेस वरील प्राप्त दोन्ही निविदाकारांचे प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्यात आले. तद्नंतर प्राप्त निविदामधील एकत्रीत नमुद केलेल्या दरामध्ये तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर नमुद केलेले निविदाकार Mayo Vessels and Machines Pvt Ltd यांच्या बरोबर दराची वाटाघाटी केली असता त्यांनी वाटाघाटी अंती खालील प्रमाणे दर नमुद केले आहेत व तसे पत्र दिले आहे.

| अ.क्र. | तपशिल | वाटाघाटी नंतर नमुद दर |
|---|---|---|
| १ | १०० TPD MSW Processing Plant प्रकल्प मशिनरी पुरविणे व बसविणे. | रु. ३००/- लक्ष (सर्व टॅक्स सहीत) |
| २ | १०० TPD MSW Processing Plant चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे. | रु. ५९०/- प्रती टन नुसार ५ वर्षाकरीता रु. रु. १०७६.७५ लक्ष (सर्व टॅक्स सहीत) |
| | एकुण | रु. १३७६.७५ लक्ष (सर्व टॅक्स सहीत) |

कचरा प्रक्रियामधुन निर्माण होणाऱ्या खतावर सदर एजन्सी मार्फत रु. १५/- प्रती टन खताच्या विक्रीवर इतकी रॉयल्टी म.न.पा.स प्राप्त होणार आहे.

वरील कामामध्ये खालील प्रमाणे कामे एजन्सी मार्फत करणे आवश्यक आहे.

१) बुरुडगांव स. नं. ३४ याठिकाणी प्राप्त झालेल्या मिश्र स्वरुपाच्या कचऱ्याचे वर्गीकरण करुन त्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करुन खत निर्मिती करणे.

२) रिसायकलेबल वेस्ट वर प्रक्रिया करणे व विल्हेवाट करणे.

३) आर.डी.एफ. प्लॅन्ट विकसीत करणे.

४) Inert मटेरीयलची सॅनेटरी लॅण्ड फील मध्ये विल्हेवाट लावणे.

वरील सर्व कामांसाठी आवश्यक ती यंत्र सामुग्री व वाहने कंत्राटदार स्वत: उपलब्ध करेल व सदर ठिकाणी आवश्यक विज देयक व वापरण्यात येणाऱ्या पाण्याचा खर्च ही जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच प्रकल्पाच्या सुरक्षतेची जबाबदारी एजन्सीवर राहील.

त्यानुसार बुरुडगांव स. नं. ३४ याठिकाणी १०० TPD MSW Processing Plant करीता प्राप्त निवीदा मध्ये वाटाघाटी नंतर वरील प्रमाणे नमुद केलेले दराबाबत निर्णय घेणेस व प्रस्ताव मा. स्थायी समिती कडेस सादर करणे बाबत सविनय सादर.

येणे प्रमाणे प्रकल्प विभाग प्रमुख यांचा अहवाल असे

यावर उपायुक्त (कर ) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित प्रमाणे मान्यता देणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,स्थायी समितीमध्ये ठेवा,मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणा-या घनकच-यावर बुरुडगांव स. नं. ३४ या ठिकाणी दैनंदिन १०० मे.टन क्षमतेचा (Processing Plant १०० TPD at Burudgaon ) मशिनरी उभारणे व पाच वर्षाकरीता देखभाल व दुरुस्ती बाबत फेर ई- निविदा

क्र.२१२१ अन्वये मागविण्यात आलेल्या ई -निविदेचा लिफाफा क्र.२ दराबाबतचा तुलनात्मक तक्ता मंजुरीस्तव.

मा.श्री.कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.,

मा.श्री.गणेश भोसले :- सदर विषयाबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- अहमदनगर महानगरपालिका हद्दी मध्ये निर्माण होणा-या घनकच-यावर प्रक्रीया करून खत निर्मीती करणे बाबतचा १०० मे.टन क्षमतेचा प्रकल्प उभारवायचा आहे.त्यात मशिनरी उभारणे व ५ वर्षा करीता देखभाल दुरूस्ती सह उभारणी करणे करीता निविदा मागविण्यात आलेली आहे.सदर कच-या मधून काचा प्लास्टीक वेगळे करणे हि संपुर्ण ठेकेदाराची जबाबदारी असेल.उर्वरित शिल्लक राहिलेल्या कच-यामधून ज्या कच-याचे कंम्पोस्ट तयार होणार नाही त्याचे लॅडफिल करणे ठेकेदाराची जबाबदारी असेल.शहरामध्ये दैनंदिन १४० मे.टन घनकचरा निर्माण होतो.बुरूडगांव डेपोयेथे १०० मे.टन.चा प्रकल्प व सावेडी भागातील डेपोवर ४० मे.टन कचरा विल्हेवाट लावता येईल.

मा.श्री.गणेश भोसले : - या पुर्वी नेमण्यात आलेल्या ठेकेदाराबाबत काय तक्रारी आल्या होत्या.प्लॉन्ट वर सर्व प्रकारचा कचरा स्वीकारला पाहिजे.नंतर त्याने तक्रार करू नये

मा.श्री.कुमार वाकळे :- शहरातुन जमा होणा-या कच-यामध्ये काचेचे प्रमाणे मोठया प्रमाणावर असल्याने यापुर्वी तयार झालेल्या कंम्पोस्ट खतामध्ये काचेचे प्रमाण जास्त आहे.त्यामुळे शेतक-यांकडून सदर खताला मागणी येत नाही.कच-यामधील काचा वर्गीकरण करून वेगळया करण्याची जबाबादारी ठेकेदाराने स्वीकारणे गरजेचे आहे.

मा.सभापती साहेब :- सदर ठेकेदार संस्थेबरोबर करार करतांना करारा मध्ये सर्व प्रकारचा कचरा स्वीकारला जाईल व ओला व सुका काचा,प्लास्टीक यांचे वर्गी करण करून कंम्पोस्ट तयार करणे बाबत करारनाम्यामध्ये उल्लेख करण्यात यावा.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- सदर प्रकल्पाच्या ठिकाणी सी.सी.टि.व्ही.कॅमेरे बसविणे, तसेच वेळोवेळी कचरा डोपो ला लागणा-या आगी करीता प्रथमीक अग्नीशमन यंत्रणाउभारणे आवश्यक आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- कचरा प्रकल्प नविन ठेकेदाराच्या ताब्यात देण्या पुर्वी सध्याच्या आस्तीत्वातील मशीनरी ,इमारती बाबतचे फोटो,व्हिडीओ शुटींग काढून ठेवण्यात यावे.जेणे करून सध्याची परिस्थिती व ठेका दिल्यानंतर ठेकेदाराने केलेल्या सुधारणा पहाता येतील.

मा.श्री.कुमार वाकळे :- खत प्रकल्प सलग चालू रहाणे आवश्यक आहे. या करीता ठेकेदाराचे देयके १४ व्या वित्ता आयोगातुन देण्यात यावीत.जेणे करून प्रकल्प बंद होणार नाही.तसेच ठेकेदारामार्फत प्रकल्पाच्या ठिकाणी सी.सी.टि.व्ही.कॅमेरे बसविण्यात यावे.तसेच परिसरातील शेतक-यांचे शेताचे नुकसान होणार नाही या बाबत दक्षता घेण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल या प्रमाणे कार्यवाही करून ई- निविदा क्र.२१२१ मंजूर करण्यात यावी.

मा.सौ.संध्या पवार :- प्रकल्पाचे काही नुकसान झाल्यास किंवा नैसर्गीक आपत्ती पासुन सुरक्षतेची जबाबदारी ही संबंधीत ठेकेदाराची राहिल.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणा-या घनकच-यावर बुरुडगांव स. नं. ३४ या ठिकाणी दैनदिन १०० मे.टन क्षमतेचा (Processing Plant १०० TPD at Burudgaon )मशिनरी उभारणे व पाच वर्षाकरीता देखभाल व दुरुस्ती बाबतच्या ई- निविदा क्र.२१२१ या निविदेस व या प्रकल्पाच्या ठिकाणी सी.सी.टि.व्ही.कॅमेरे बसविणे व तसेच नैसर्गीक आपत्ती पासुन सुरक्षतेची जबाबदारी ही संबंधीत ठेकेदाराची राहिल. तसेच परिसरातील शेतक-यांचे शेताचे नुकसान होणार नाही या बाबत दक्षता घेण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल.१०० मे.टन क्षमतेचा (Processing Plant १०० TPD at Burudgaon ) मशिनरी उभारणे करीता रू.३०० लक्ष व Plant चालविणे, देखभाल दुरुस्ती करणे.करीता रु. ५९०/- प्रती टन नुसार ५ वर्षाकरीता रु. १०७६.७५ लक्ष येणारा खर्च १४ व्या वित्ता आयोगाच्या निधीतुन करण्यास ही सभा मान्यता देत आहे

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये निर्माण होणा-या घनकच-यावर बुरुडगांव स. नं. ३४ या ठिकाणी दैनदिन १०० मे.टन क्षमतेचा (Processing Plant १०० TPD at Burudgaon ) मशिनरी उभारणे व पाच वर्षाकरीता देखभाल व दुरुस्ती बाबतच्या ई- निविदा क्र.२१२१ या निविदेस व या प्रकल्पाच्या ठिकाणी सी.सी.टि.व्ही.कॅमेरे बसविणे व तसेच नैसर्गीक आपत्ती पासुन सुरक्षतेची जबाबदारी ही संबंधीत ठेकेदाराची राहिल. तसेच परिसरातील शेतक-यांचे शेताचे नुकसान होणार नाही या बाबत दक्षता घेण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल.१०० मे.टन क्षमतेचा (Processing Plant १०० TPD at Burudgaon ) मशिनरी उभारणे करीता रू.३०० लक्ष व Plant चालविणे, देखभाल दुरुस्ती करणे.करीता रु. ५९०/- प्रती टन नुसार ५ वर्षाकरीता रु. १०७६.७५ लक्ष खर्च १४ व्या वित्ता आयोगाच्या निधीतुन करण्यास ही सभा मान्यता देत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.सौ.संध्या पवार सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- ८४ सोमवार दि.०९/०९/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान (राज्यस्तर)(व्याजाचे रकमेतुन) सन २०१८-२०१९ ई - निविदा क्र.२१११ या निविदेच्याअंतर्गत तोफखाना पोलीस चौकी ते भिस्तबाग चौक ते गजराज फॅक्टरी ते भिस्तबाग महालापर्यंतचा रस्ता विकसित करणे मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

उपरोक्त विषयान्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. प्रशासकीय मान्यता- मा.शासन,नगर विकास विभाग मंत्रालय,मुंबई दि.१५/१२/२०१८

२. ऑनलाईन ई-निविदा क्र.- २१११/सन २०१९-२० दि.०३/०८/२०१९

३. निविदा विक्री कालावधी- दि.०३/०८/२०१९ ते दि.१९/०८/२०१९

४. निविदा स्विकारणेचा कालावधी- दि.२०/०८/२०१९ ते दि.२२/०८/२०१९

५. निविदा उघडण्याचा दिनांक- २३/०८/२०१९

६. कामाची मुदत- ६ महिने

७. प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल- दि.३०/०८/२०१९ च्या तांत्रिक छाननीनुसार

| ई-निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| सा.बां.वि. /ई-निविदा क्र.२१११ / २०१८-१९ | तोफखाना पोलीस चौकी ते भिस्तबाग चौक ते भिस्तबाग चौक ते गजराज फॅक्टरी ते भिस्तबाग महालापर्यंतचा रस्ता विकसित करणे | ३,०३,८४,५२९/- | मनिषा इंफ्राकॉन प्रोजेक्ट प्रा.लि.अ.नगर | निविदा दरापेक्षा ३.९९%जादा | मे.ए.जी.वाबळे अ.नगर निविदा दरापेक्षा १.१५% जादा |
| | | | मे.ए.जी.वाबळे अ.नगर | निविदा दरापेक्षा १.१५% जादा | |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्टया रकाना क्र.६मध्ये नमुदनिविदाधारक मे.ए.जी.वाबळे अ.नगर यांचे दर नविदा दरापेक्षा १.१५% जादा आलेली आहे.सन २०१८-१९ चे चालू दरसुचीशी सदर आलेल्या दराची तुलना करता निविदा दरापेक्षा ६.५६% कमी दर येत आहेत.

तरी कमी दराचे निविदाधारक मे.ए.जी.वाबळे,अ.नगर यांचे निविदा दरापेक्षा १.१५% जादा आलेली निविदा मंजूरीसाठी मा.स्थायी समितीकडेस पाठविणेस्तव ऑफिस रिपोर्ट मान्यतेस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे उपअभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा. शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अ नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, सा.बां.विभागाचे शासन निर्णय दि.२७/९/२०१९ मधील परिच्छेद ४.४ प्रमाणे प्राप्त निविदा काराशी वाटाघाटी करून मुळ निविदा दराने विविदा मंजूरी बाबत निर्णय घेता येईल.

यावर उप अभियंता यांचा अभिप्राय की,मा.फेरसादर ,ए.जी.वाबळे यांचे समवेत मा.शहर अभियंता यांनी समक्ष चर्चा केलेनुसार श्री.ए.जी.वाबळे यांनी दि.३/९/१९ रोजी इकडेस पत्र देवून सदर काम निविदा दरापेक्षा १.१५ टक्के जादा दराने करण्यास तयार असल्याबाबत कळविले.तरी निर्णयास्तव सविनय सादर.

यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,उप अभियंता यांनी चर्चा केल्या प्रमाणे व शिफारसी मा.शहर अभियंता यांनी आक्षेपा बाबत खुलासा केल्यानुसार पृष्ठ क्र.T-१२ वरील अ मान्यतेस्तव सादर

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, निविदा दरापेक्षा १.१५ टक्के जास्त दराची आलेली निविदा निविदा दराने मान्य करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे पाठविणे उचित होईल.तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान (राज्यस्तर)(व्याजाचे रकमेतुन) सन २०१८-२०१९ ई - निविदा क्र.२१११ या निविदेच्याअंतर्गत तोफखाना पोलीस चौकी ते भिस्तबाग चौक ते गजराज फॅक्टरी ते भिस्तबाग महालापर्यतचा रस्ता विकसित करणे मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभागृहामध्ये ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.

मा.श्री.गणेश भोसले : या बाबत सविस्तर माहिती सांगा.

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- या कामा करीता ई - निविदा क्र.२१११ प्रसिध्द करण्यात आली होती.सदर कामा करीता मनिषा इंफ्राकॉन प्रोजेक्ट प्रा.लि.अ.नगर व मे.ए.जी.वाबळेअ.नगर या निविदा धारकांच्या निविदा प्राप्त झाल्या असून इंफ्राकॉन प्रोजेक्ट प्रा.लि.अ.नगर यांची निविदा निविदा दरापेक्षा ३.९९%जादा कमी दराचे निविदाधारक मे.ए.जी.वाबळे,अ.नगर यांचे निविदा दरापेक्षा १.१५% जादा आलेली निविदा निविदा दराने मान्य करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर करण्यात आलेला आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- चालू दर सुची नुसार काय फरक पडतो.

प्र.शहर अभियंता श्री.इथापे :- सन २०१८-१९ चे चालू दरसुचीशी सदर आलेल्या दराची तुलना करता निविदा दरापेक्षा ६.५६% कमी दर येत आहेत.

मा.सौ.आशा कराळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.सोनाली चितळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान (राज्यस्तर)(व्याजाचे रकमेतुन) सन २०१८-२०१९ ई - निविदा क्र.२१११ या निविदेच्याअंतर्गत तोफखाना पोलीस चौकी ते भिस्तबाग चौक ते गजराज फॅक्टरी ते भिस्तबाग महालापर्यतचा रस्ता विकसित करणे या कामा करीता निविदाधारक मे.ए.जी.वाबळे अ.नगर यांचे दर नविदा दरापेक्षा १.१५% जादा असल्याने कमी दराचे निविदाधारक मे.ए.जी.वाबळे,अ.नगर यांचे निविदा दरापेक्षा १.१५% जादा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान (राज्यस्तर)(व्याजाचे रकमेतुन) सन २०१८-२०१९ ई - निविदा क्र.२१११ या निविदेच्याअंतर्गत तोफखाना पोलीस चौकी ते भिस्तबाग चौक ते गजराज फॅक्टरी ते भिस्तबाग महालापर्यतचा रस्ता विकसित करणे  या कामा करीता निविदाधारक मे.ए.जी.वाबळे अ.नगर यांचे दर  निविदा दरापेक्षा १.१५% जादा असल्याने कमी दराचे निविदाधारक मे.ए.जी.वाबळे,अ.नगर यांचे निविदा दरापेक्षा १.१५% जादा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :-  मा.सौ.आशा कराळे    सही /-

अनुमोदक :-  मा.सौ.सोनाली चितळे    सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- ८५ सोमवार दि.०९/०९/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) सन २०१८-१९ अंतर्गत ई - निविदा क्र.१९८२ या निविदेच्या अंतर्गत नालेगांव अमरधाम येथे दहन ओटयासमोर मान्सुम शेड उभारणे मंजुरीबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग.

उपरोक्त विषयान्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. प्रशासकीय मान्यता- मा.जिल्हाधिकारी,अ.नगर दि.३१/१०/२०१८

२. ऑनलाईन ई-निविदा क्र.- १९८२/सन २०१८-१९ दि.२२/०२/२०१९

३. निविदा विक्री कालावधी- दि.२२/०१/२०१९ ते दि.०६/०२/२०१९

४. निविदा स्विकारणेचा कालावधी- दि.०७/०२/२०१९ ते दि.११/०२/२०१९

५. निविदा उघडण्याचा दिनांक- १२/०२/२०१९

६. कामाची मुदत- ४ महिने

७. प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल- दि.०७/०८/२०१९ च्या तांत्रिक छाननीनुसार

| ई-निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| सा.बां.वि. /ई-निविदा क्र.२०७७ / २०१९-२० | नालेगांव अमरधाम येथे दहन ओटयासमोर मान्सुम शेड उभारणे | ४३,०४,५५६/- | राजेंद्र ल.लोणकर अ.नगर | निविदा दरापेक्षा २.०२% कमी दराने | राजेंद्र ल.लोणकर अ.नगर यांचे दर निविदा दरापेक्षा २.०२% कमी दराने |
| | | | सुनिल राउत,अ.नगर | निविदा दरापेक्षा २.००% जादा दराने | |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्टया रकाना क्र.६मध्ये नमुद निविदाधारक राजेंद्र ल.लोणकर अ.नगर यांची निविदा,नविदा दरापेक्षा २.०२% इतक्या कमी दराची आहे.सदर निविदाधारकाने दि.२६ नोव्हेंबर २०१८ रोजीच्या सुधारीत शासन निर्णयाप्रमाणे व्यापारी लिफाफा उघडल्यापासुन ८ दिवसाचे आत रक्कम रू.४३,११०/- रकमेचा डिमांड ड्राफ्ट (डि.डि.क्र.१८४१० दि.२२/८/२०१९ युको बॅंक अ.नगर ) इकडेस जमा केलेला आहे.

तरी उक्त बाब विचारात घेवून श्री.राजेंद्र ल.लोणकर ,अ.नगर यांची निविदा दरापेक्षा २.०२ टक्के कमी दराची निविदा मान्यतेस्तव मा.स्थायी समितीकडेस पाठविणेस्तव सदरचा ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,प्रस्तावानुसार श्री.राजेंद्र ल.लोणकर अ.नगर यांचे निविदा दर सर्वात कमी मात्र निविदा दरापेक्षा २.०२ टक्के कमी दराची असून दि.२६/११/२०१८ चे शसन निर्णयानुसार अतिरिक्त रकमेचा डी.डी.प्रस्तावात नमुदप्रमाणे सादर केलेला आहे.करिता निविदा मान्य करणे योग्य

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.शाहर अभियंता यांची तांत्रीक छाननी समितीच्या दि.७/८/२०१९ च्या (पृष्ठ ८९)च अभिप्रया नुसार पात्र निविदा कराच्या व्यापारी लिफाफा कधी उघडल्या दिवसाची प्रस्तावात

जाणीव पुर्वक उल्लेख करण्यात येत नाही तरी अत्यंत गंभर बाब असून यापुढे व्यापारी लिफाफा उघडण्याची दिनांक नमुद करण्याची मा.शहर अभियंता दक्षता घ्यावी त्रुटीची पुर्तत सह फेरसादर करावे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,प्राप्त निविदांचा व्यापारी लिफाफा दि.२१/८/२०१९ रोजी उघण्यात आलेला आहे.मान्यतेस फेर सादर

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,विभागाने त्रुटीची पुर्तता केल्या नुसार मा.शहर अभियंता यांच्या प्रस्तवानुसार पृ.क्र.टि -९ वरील अ प्रमाणे २.०२ कमी दराची निविदा मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, पृष्ठ क्र.टि -९ वरील अ मध्ये प्रस्तावित केल्यानुसार व मुलेप यांच्या अभिप्रायानुसार २.०२ टक्के कमी दराची निविदा मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) सन २०१८-१९ अंतर्गत ई - निविदा क्र.१९८२ या निविदेच्या अंतर्गत नालेगांव अमरधाम येथे दहन ओटयासमोर मान्सुम शेड उभारणे मंजुरीबाबत ऑफिस रिपोर्टआहे.

मा.श्री.गणेश भोसले :- ऑफिस रिपोर्ट वाचा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट चे वाचन करण्यात आले.

मा.श्री.गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.गणेश भोसले :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) सन २०१८-१९ अंतर्गत ई - निविदा क्र.१९८२ अंतर्गत नालेगांव अमरधाम येथे दहन ओटयासमोर मान्सुम शेड उभारणे कामा करीता श्री.राजेंद्र ल.लोणकर ,अ.नगर यांची निविदा दरापेक्षा २.०२ टक्के कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) सन २०१८-१९ अंतर्गत ई - निविदा क्र.१९८२ अंतर्गत नालेगांव अमरधाम येथे दहन ओटयासमोर मान्सुम शेड उभारणे कामा करीता श्री.राजेंद्र ल.लोणकर ,अ.नगर यांची निविदा दरापेक्षा २.०२ टक्के कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.गणेश कवडे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.गणेश भोसले सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- ८६ सोमवार दि.०९/०९/२०१९

**प्रस्तावाचा विषय :-** निलक्रांती चौक ते दिल्ली दरबार हॉटेल ते नेप्ती दिल्लीगेट - बालिकाश्रम पावसाळी गटरचे चेंबर पर्यत १२०० एम.एम.व्यासाची पावसाळी गटर बाबत महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७(३) क नुसार केलेली कार्यवाही प्रतिवृत्त अवलोकनार्थ कार्यवाहीस्तव.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग.

कळविण्यांत येते की, शासनाने वैशिष्यपुर्व योजतुन रूपये १० कोटी निधीमधुन विषयांकित कामाकरीता सुमारे १०५ लक्ष निधी २०० एम.एम.लांबीला १२०० एम.एम.आर.सी.सी. पाईप ६०० एमएम , लांबीला १७० मी पाईप व ९ मीटर रूंदीच्या १५० मीटर लांब रस्ता कॉक्रीटीकरण असे मंजुर आहे. सदरचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मे.ए.सी. कोठारी , अहमदनगर या ठेकेदारामार्फत चालु आहे दरम्यान गटरसाठी दिनांक १०/७/२०१९ रोजी खोदाई हॉटेल दिल्ली दरबार येथे अस्थित्यातील गटर जोडण्याकरीता चालू केले असता तेथील खोली योग्य नसल्याचे निदर्शनास आले त्यामुळे सार्वजनिक बांधकाम व महानगरपालिका संबंधीत सर्व अधिकारी यांचे समक्ष लेव्हलची तपासणी केली असता पाणी पुर्णपणे निचरा होणेकामी दिल्लीगेट ते नेप्ती या मोठया गटारीच्या चेंबरला जोडणे योग्य आहे असे निदर्शनास आले यामुळे सर्वानुमते सदरचे काम अस्थित्वातील दिल्लीगेट ते नेप्ती नाका गटारीस जोडण्याचे ठरले त्यानुसार दिनांक १०/७/२०१९ रोजी सदर मुख्य चेंबर ते दिल्ली दरबार हॉटेल निलक्रांती चौक पर्यत करण्यात आली परंतु त्यामध्ये विविध केबल, पाण्याची पाईप लाईन , गटर इ लागल्या आहेत जोपर्यत सदर लाईन महानगरपालिका दुस-या ठिकाणी हालवत नाही तोपर्यत सार्वजनिक बांधकाम विभाग काम करणार नाही हे धोरण ठेवल्याने दिनांक १०/७/२०१९ ते १९/७/२०१९ पर्यत काम जैसे-थे राहीले. दिनांक २०/७/२०१९ रोजी शहरात मोठया प्रमाणात पाउस झाल्याने मोठया प्रमाणात नुकसान झाले दरम्यान सदर खोदाईमुळे देखील वाहतुकीचा निलक्रांती चौक येथे मोठया प्रमाणात खोळांबा होवुन पोलिस प्रशासन व महानगरपालिका प्रशासनावर दबाब येत आहे.

दरम्यान काम दिनांक २०/७/२०१९ रोजीच्या पावसामुळे पुनश्च वाहतुकीचा खोळांबा होवु नये व काम त्वरीत होण्याच्या दृष्टीने व खोदाई झालेली असलेने काम त्वरीत होणे आवश्यक असलेने सार्वजनिक बांधकाम विभागाची मंजुर निविदा निलक्रांती चौक हॉटेल दिल्ली दरबार ते न्यु आर्टस कॉलेज व पर्यत २०० मीटर लांबीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्याचे अपेक्षित आहे व निलक्रांती चौक ते हॉटेल दिल्ली दरबार ते नेप्तीचौक दिल्लीगेट बालिकाश्रम या पावसाळी गटरच्या मुख्य चेंबरपर्यतचे काम महानगरपालिकामार्फत करावयाचे ठरले.

त्यानुसार श्री. धनंजय जाधव मा.नगरसेवक व मा.उपमहापौर सौ. ढोणे यांचे समक्ष पहाणी अंती व त्यांचे दुरध्वनीनुसार समक्ष पहाणीअंती आढावा घेवुन दिनांक २०/७/२०१९रोजीच्या मोठया पावसाची अतिवृष्टी झ ााल्यास निविदा व वित्त हानी होवु नये याकरीता मा.आयुक्त व तद्नंतर मा. शहर अभियंता यांचेशी दुरध्वनीवरून दिलेली आदेशानुसार महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७, ३ क नुसार उदभवलेल्या आपत्कालीन परिस्थितीतुन बाहेर पडणेकामी त्वरीत करावे लागणार असल्याने मा. आयुक्त अधिकारात महानगरपालिकेचे नियमीत ठेकेदार मे.एस.एस.शेख कन्स्ट्रक्शन, अ.नगर (ठेकेदार नोंदणी केलेली, कामांची यादी, GST, EPF नोंदणी व निविदा दराने काम करण्यास तयार असलेबाबत संमतीपत्र इ. सोबत घेण्यात जोडले आहे) यांचेकडून करणेचे आदेश देण्यात आहे त्यानुसार दिनांक २१/७/२०१९ रोजी काम हाती घेण्यात आलेले आहे.

वरील रिपोर्ट अवलोकनार्थ तथा सोबतच्या मसुदाप्रमाणे महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७/३/क नुसार मे.एस.एस. शेख कन्स्ट्रक्शन, अ.नगर यांचे होणारे कामाचे मोजमाप घेवुन व म.जि.प्रा. चे सन २०१८-२०१९ चे दरसुचीचे दर वापरून निविदा दराने काम करणेचे व महानगरपालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन सन २०१९-२० या लेखशिर्षकात नोंदविणेस आदेश होणेस विनंती रिपोर्ट सादर व सार्वजनिक बांधकाम विभाग यांना महानगरपालिकाद्वारे करण्यात येणारे कामाचे दुबार नोंद करू नये व निलक्रांती चौक दिल्ली दरबार हॉटेल ते न्यु आर्टस कॉलेज असे २०० मीटरचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करून घेणेस कळविणेस रिपोर्ट मान्यतेस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा रिपोर्ट असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की, नागरिकांचे आरोग्याचे व सुरक्षिततेच्या कारणांसाठी प्रस्तावीत काम करणे आवश्यक आहे. करिता मान्य करणे योग्य

यावर मा. उपायुक्त (कर) यांची अभिप्राय की, पूर्व पृष्ठावरील "अ" मध्ये नमूद केलेनुसार "ब" व उपरोक्त "क" मध्ये नमुद केलेनुसार कार्यवाही करणेकामी निर्णयार्थ व मान्यतेसाठी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, खर्चाचा अंदाज दयावा.

यावर कनिष्ठ अभियंता यांचा अभिप्राय की, फेरसादर प्रत्यक्ष केलेल्या कामाचे मोजमाप घेवून mjp दरसुची २०१९-२० नुसार रूपये ४,५५,२५७/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार प्रस्तावीत रिपोर्ट मान्यतेस सादर.

यावर मा. शहर अभियंता यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार महा. अधि.१९४९ चे कलम ६७(१) नुसार मान्यता देणे योग्य

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

oooo

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत न्यु आर्टस कॉलेज ते निलक्रांती चौक येथे १२०० एम.एम. व ६०० मी. रस्ता बाजू गटर व रस्ता कॉक्रीटीकरण असे काम मंजूर आहे परंतु पाण्याचा पुर्णपणे निचरा होणेकामी सदर गटर नेप्ती चौक- दिल्लीगेट- बालिकाश्रम गटरच्या चेंबर लगत जोडणेत यावे भविष्यातील कायमस्वरूपीचा प्रश्न मिटविणेसाठी व दिनांक २०/०७/२०१९ रोजीच्या ढगफुटी सदृष्य मुसळधार पावसाने जरी जिवितहानी झालेली नाही तरी जिवित हाणी होण्याची दाट शक्यता असल्याने आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्याने विषयांकित काम तातडीने होणे आवश्यक आहे व सदर काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निविदेमध्ये समाविष्ट नाही.

त्याकरीता मा.आयुक्त ,अहमदनगर महानगरपालिका यांनी महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७ (३) क चा अधिकार वापरून आपण सदरचे काम मे.एस.एस. शेख कन्ट्रक्शन,अहमदनगर यांना ३ दिवसात शहर अभियंता यांचे सुचनेनुसार पुर्ण करण्याचे आदेश दिले सदर कामाकरिता अंदाजे रक्कम रूपये ४,५५,२५७/- चे कामास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदरचे काम मे. एस.एस. शेख कन्ट्रक्शन , अहमदनगर यांचेकडून करून घेण्यास जा.क्र. बांधकाम १०१७ दिनांक ३१/७/२०१९ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार केलेल्या कामाचे मोजमाप शहर अभियंता यांचे अधिपत्याखाली व शासनाचे म.जि.प्रा. चे दरसुची सन २०१८-२०१९ नुसार निविदा दराने व नियमानुसार कार्यवाही करणे आदेशीत करणेत येत आहे.

वरील प्रमाणे केलेली कार्यवाही प्रतिवृत्त स्थायी समिती व महानगरपालिका यांचेकडेस अवलोकनार्थ पाठविणेस कार्यवाहीस्तव सादर.

येणेप्रमोणे शहर अभियंता यांचा पत्र असे

सोबत- १. मंजुर टिप्पणी छायांकित प्रत
२. ठेकेदारास दिलेले आदेश छायांकित प्रत

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- निलक्रांती चौक ते दिल्ली दरबार हॉटेल ते नेप्ती दिल्लीगेट - बालिकाश्रम पावसाळी गटरचे चेंबर पर्यत १२०० एम.एम.व्यासाची पावसाळी गटर बाबत महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७(३) क नुसार केलेली कार्यवाही प्रतिवृत्त अवलोकनार्थ हा विषय आहे.

मा.श्री.गणेश भोसले :- कोठे गटर केली आहे.ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसारऑफिस रिपोर्टचे सभागृहामध्ये वाचन करण्यात आले.

मा.श्री.गणेश कवडे :- निलक्रांती चौक ते दिल्ली दरबार हॉटेल ते नेप्ती दिल्लीगेट - बालिकाश्रम पावसाळी गटरचे चेंबर पर्यत १२०० एम.एम.व्यासाची पावसाळी गटर बाबत महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७(३) क नुसार केलेली कार्यवाही प्रतिवृत्त अवलोकन झाले आहे.मा.सभापती साहेब, मागील ब-याच स्थायी समितीच्या बैठकी मध्ये जाहिरात बोर्ड बाबत चर्चा झालेली आहे.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर शहरात आपण किती जाहिरात बोर्ड आहेत.

जाहिरात विभाग क्लार्क श्री.देशमुख :- महानगरपालिकेने ७१ जाहिरात बोर्ड करीता परवानगी दिलेली आहे.

मा.श्री.ज्ञानेश्वर येवले :- सध्या या बोर्ड चे काम कोणत्या ठेकेदार एजन्सी कडे आहे.

जाहिरात विभाग क्लार्क श्री.देशमुख :- मे.चंगेडीया आउट डोअर ॲड. प्रा.ली.या ठेकेदार एजन्सी कडे आहे.

मा.सभापती साहेब :- मे.चंगेडीया आउट डोअर ॲड. प्रा.ली.या ठेकेदार एजन्सी ने आजच सभेमध्ये अर्ज देवून मुदतवाढ मिळणे करीता मागणी केली आहे.

मा.श्री.गणेश कवडे :- किती वर्ष मुदत वाढ आपल्याला देता येईल.

जाहिरात विभाग क्लार्क श्री.देशमुख :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ जाहिरात व फलक नियंत्रण २००३ मधील कलम ७९,२८ (ड) नुसार दोन वर्षासाठी परवानगी देता येईल.

मा.श्री.ज्ञानेश्वर येवले :- विषयपत्रीकेवरील पुर्ननियुक्तीबाबतच्या ऑफिस रिपोर्टला मान्यता देण्यात यावी.व सध्या कार्यरत असलेले मे.चंगेडीया आउट डोअर ॲड. प्रा.ली. यांना ७१ होर्डीग बोर्डाना दोन वर्षा करीता मुदतवाढ देण्यात यावी.

मा.श्री. गणेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा. महानगरपालिकेने ७१ जाहिरात बोर्ड करीता परवानगी दिलेली असून सध्या फक्त २१ ठिकाणी जाहिरात बोर्ड लावण्यात आलेले आहेत.तांत्रिक बाबींचा अडथळा असल्या मुळे जाहिरात बोर्ड न लागल्याने जाहिरात कर म.न.पा.स मिळत नाही. अहमदनगर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने सदरची बाब महानगरपालिकेच्या हिताची असल्याने महानगरपालिकेने व ठेकेदार संस्था यांनी सर्व्हे करून इतरत्र पर्यायी जागा उपलब्ध्द करून दयावी. ७१ होर्डीग बोर्डाना दोन वर्षा करीता मुदतवाढ देण्यात येवून त्यांच्या भाडयामध्ये २०% भाडेवाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- निलक्रांती चौक ते दिल्ली दरबार हॉटेल ते नेप्ती दिल्लीगेट - बालिकाश्रम पावसाळी गटरचे चेंबर पर्यत १२०० एम.एम.व्यासाची पावसाळी गटर बाबत महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७(३) क नुसार केलेली कार्यवाही प्रतिवृत्त अवलोकनार्थ कार्यवाहीस्तव.खर्च मंजूर.

सभेमध्ये श्री.आदेश राजमल चंगेडीया यांची संस्था मे.चंगेडीया आउट डोअर ॲड. प्रा.ली..यांचा प्राप्त अर्ज व त्यावर झालेल्या चर्चे नुसार महानगरपालिकेने ७१ जाहिरात बोर्ड करीता परवानगी दिलेली असून सध्या फक्त २१ ठिकाणी जाहिरात बोर्ड लावण्यात आलेले आहेत.तांत्रिक बाबींचा अडथळा असल्या मुळे जाहिरात बोर्ड न लागल्याने जाहिरात कर म.न.पा.स मिळत नाही. अहमदनगर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने सदरची बाब महानगरपालिकेच्या हिताची असल्याने महानगरपालिकेने व ठेकेदार संस्था यांनी सर्व्हे करून इतरत्र पर्यायी जागा उपलब्ध्द करून दयावी. मे.चंगेडीया आउट डोअर ॲड. प्रा.ली. यांना पुढील दोन वर्षाकरीता मुदतवाढ देवून २०% भाडेवाढ करून महाराष्ट्र शासन राजपत्र २१ जुन २०१४ अन्वये कार्यालयीन अटी व शर्ती प्रमाणे मुदतवाढ व भाडेवाढ करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** निलक्रांती चौक ते दिल्ली दरबार हॉटेल ते नेप्ती दिल्लीगेट - बालिकाश्रम पावसाळी गटरचे चेंबर पर्यत १२०० एम.एम.व्यासाची पावसाळी गटर बाबत महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७(३) क नुसार केलेली कार्यवाही प्रतिवृत्त अवलोकनार्थ कार्यवाहीस्तव.खर्च मंजूर. सभेमध्ये श्री.आदेश राजमल चंगेडीया यांची संस्था मे.चंगेडीया आउट डोअर ॲड. प्रा.ली..यांचा प्राप्त अर्ज व त्यावर झालेल्या चर्चे नुसार महानगरपालिकेने ७१ जाहिरात बोर्ड करीता परवानगी दिलेली असून सध्या फक्त २१ ठिकाणी जाहिरात बोर्ड लावण्यात आलेले आहेत.तांत्रिक बाबींचा अडथळा असल्या मुळे जाहिरात बोर्ड न लागल्याने जाहिरात कर म.न.पा.स मिळत नाही. अहमदनगर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने सदरची बाब महानगरपालिकेच्या हिताची असल्याने महानगरपालिकेने व ठेकेदार संस्था यांनी सर्व्हे करून इतरत्र पर्यायी जागा उपलब्ध्द करून दयावी. बोर्डाचे माप मोठे होउ शकत असेल ते बोर्ड मोठे करावे. त्यानुसार वाढीव भाडे आकारण्यात यावे. जस जसे नविन जाहिरात बोर्डलागतील त्यानुसार महानगरपालिकेस कळविण्यात यावे. मे.चंगेडीया आउट डोअर ॲड. प्रा.ली. यांना पुढील दोन वर्षाकरीता मुदतवाढ देवून २०% भाडेवाढ करून महाराष्ट्र शासन राजपत्र २१ जुन २०१४ अन्वये कार्यालयीन अटी व शर्ती प्रमाणे मुदतवाढ व भाडेवाढ करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.ज्ञानेश्वर येवले सही /-

अनुमोदक :- मा.श्री.गणेश कवडे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका